डॉ. नितीन मोरे

# चक्रमादित्याचा दरबार



२

# चक्रमादित्याचा दरबार :२

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# चक्रमादित्याचा दरबार :२

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# चक्रमादित्याचा दरबार

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ६ फ़ेब्रुवारी २०१८

©esahity Pratishthan®2018

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

चक्रमादित्याचा दरबार..

भाग २

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo. com

या सर्व नाटिका, व त्यातील व्यक्ती, नावे, पात्रे, पत्रे, योजना काल्पनिक आहेत आणि यांचा कोणाही जीवित वा मृत राजे, संस्थाचालक, मालक, सोसायट्यांचे पदाधिकारी, राजकीय पुढारी, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था, त्यांचा कारभार वगैरेंशी साम्य आढळल्यास कुणाकडे बोलू नका.

योगायोग असतात!

दुसरं काय!

प्रस्तावना

राज्य तेच..

महाराज ही तेच !

चक्रमपुराचे चक्रमादित्य !

फक्त आता राजाला नव्याने जाग आलीय..

कात टाकून राजा जागा झालाय म्हणाना..

आपल्या अधिकारांची नि हक्कांची.. त्याहूनही आपल्या ताकदीची जाणीव झालीय..

महाराजांकडे आता काय नाही?

हुकूम झेलायला सेवक आहेत..

त्यांचे फतवे आनंदाने पाळणारी जनता आहे.

याहून एखाद्या राज्यकर्त्यास काय हवे?

राजाची प्रगती होतेय.. आणि त्यामुळे चक्रमपुरही मोठे होतेय.. त्या दरबारची ही सफर!

अधिकार गाजवणे.. एकाधिकारशाही.. हुकुमशाही या एकाच गोष्टीच्या evolve होणाऱ्या अवस्था आहेत.

जनमानसात हुकुमशाहीचे म्हणा किंवा कोणा ताकदवान, बलवान राज्यकर्त्याचे म्हणा एक सुप्त आकर्षण असते.

याचा अभ्यास असणारा हा नव्याने कात टाकलेला चक्रमादित्य नि त्याचा दरबार पुन्हा एकदा भेटीस या दुसऱ्या भागातून येत आहे.

अर्थात हा राजा ही काल्पनिक.. प्रजा ही काल्पनिक..

तेव्हा कोठे साधर्म्य असल्यास अर्थातच हा योगायोग!

डॉ. नितीन मोरे

अर्पणपत्रिका

नव्या चक्रमादित्याच्या नव्या राज्यास !

चक्रमादित्य महाराज दरबारात येतात. हातात एक कागदी फूल.

दरबारी : महाराजांचा विजय असो..

महाराज (रागाने) : एवढीच घोषणा? या भूराजाच्या आगमनाची वर्दी ती एवढीच?.. प्रधांजी..

प्रधानजी : आज्ञा महाराज..

महाराज : ही अशी संक्श.. संक्ख्प.. संक्षिपत.. विक्षिप्त.. संक्षिप्त.. घोषणा? कुणी आज्ञा दिली.. ?

प्रधानजी : क्षमा असावी महाराज.. पण..

महाराज : पण बिण काही नाही.. शिक्षा ही झालीच पाहिजे..

प्रधानजी : लहान तोंडी मोठा घास घेतो महाराज.. अभय असावे.. पण एक म्हणणे ऐकून घ्यावे.. दरबारी पुढील जयजयकार करणारच होते.. त्रिघोषणा हा नवा कार्यक्रम अमलात येतोय..

महाराज : त्रिघोषणा?

प्रधानजी : होय महाराज.. आपण ऐकली ती पहिली.. या घोषणा दरबारी आपल्या आगमनानंतर देतील.. दुसरी आणि तिसरी ऐकावी महाराज..

महाराज : वा प्रधांजी.. त्रिघोषणा! ऐकवा..

दरबारी : राजाधिराज चक्रवर्ती चक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज : आता तिसरी..

दरबारी : महाराज अमर रहे..

महाराज : प्रधांजी.. आम्ही असे ऐकले होते की ही तिसरी कोणी गेल्यावर..

प्रधानजी : क्षमा महाराज.. पण आपले साम्राज्य कधी नष्ट न होवो म्हणजे अमर रहावे असे म्हणावे म्हणून.. जबतक सूरज चांद रहेगा. असे म्हणतात महाराज..

महाराज : तीन झाल्या मग ही चौथी का नको? ही पण म्हणावी..

प्रधानजी : जो हुकूम हुजूर..

प्रधानजी हाताने इशारा करतात. सगळे दरबारी एक सुरात..

दरबारी : जब तक सूरज चांद रहेगा चक्रमादित्य का नाम रहेगा..

महाराज : वा! कान तृप्त झाले या चतुर घोषणांनी..

प्रधानजी : थ्यांक यू महाराज.. !

महाराज : प्रधांजी, काय हाल हवाल राज्याची?

प्रधानजी : उत्तम महाराज.. सगळे सुखी.. असा आदेशच काढलाय आपल्या गृह खात्याने.. त्यामुळे सगळेच सुखी

महाराज : वा प्रधांजी.. आमचा आम्हालाच अभिमान वाटतो.. आमच्या राज्याच्या प्रगतीबद्दल आम्हाला असेच ऐकवत रहा

प्रधानजी : हुकूम महाराज.. प्रजा खाऊन पिऊन सुखी आहे

महाराज : ते खाण्याचे नाव नका काढू.. खा- म्हणता बरोबर आम्हांस भूक लागू लागते..

प्रधानजी : क्षमा महाराज.. तर राज्य प्रगतीपथावर आहे

महाराज : शाबास!

प्रधानजी : थ्यांक्यू महाराज! आपल्या आदेशानुसार आम्ही तशी सक्तीच केलीय आता, प्रजाजनांस सुखी व्हावेच लागेल..

महाराज : वा प्रधांजी! आम्हाला आमचाच अभिमान वाटतो..

प्रधानजी : मागे आपण असे फलक जागोजागी रस्त्यारस्त्यावर लावण्याचे आदेश दिले होते.. आता आमच्या अंमलबजावणी खात्याने हे फलक घरोघरी लावण्याचे आदेश बजावले आहेत..

महाराज : वा! आम्ही खूप खूश आहोत.. अजून नवीन काही आदेश काढलेत?

प्रधानजी : आपल्या आदेशानुसार महाराज लवकरच एक देश एक वेश अंमलात येईल.. त्यानुसार सर्व देशातील नागरिकांना एकच एक गणवेश घालावा लागेल.. तेही येत्या दोन दिवसांतच..

महाराज : वा! त्यामुळे देशातील नागरिकांतील भेदभाव नाहीसा होईल.. एकी येईल.. आम्ही अत्यंत चतुर आहोत!

प्रधानजी : यात काहीच संशय नाही महाराज.. आपल्या आदेशातील अर्थ आमचे अंमलबजावणी खाते शोधून काढते आहे.. त्यातून नव्या शक्यता तपासून अजून नवे आदेश काढते..

महाराज : आम्ही खूश आहोत.. या अंमलबजावणी मंत्र्यांना ताबडतोब पदोन्नती द्या.. वाढवा वेतन त्यांचे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.. परंतु ते आमच्या सांगण्यानुसार वागतात.. महाराजांच्या चाणाक्ष नजरेत हे आले असेलच..

महाराज : होय प्रधांजी.. तुम्हालाही वेतन वाढ मिळेल प्रधांजी..

प्रधानजी : थ्यांक्यू महाराज.. त्यांनी गणवेशापुढे जाऊन लोकांनी दररोज काय खावे याचाही आम्ही मेनू ठरवला आहे..

महाराज : उत्तम प्रधांजी.

प्रधानजी : त्या अनुसार दर आठवड्याच्या दर दिवशी सर्व घरात एकाच प्रकारचे जेवण बनेल.. त्यामुळे राज्यभरात एकी येईल

महाराज : उत्तम.. शाबास प्रधांजी.. सर्वांनी एक होण्यासाठी सर्वांनी एक वेश घालावा.. एक जेवण जेवावे.. अत्युत्तम कल्पना.. आम्ही म्हणालो ना.. आम्ही अत्यंत हुशार आहोत.. चतुर आहोत..

प्रधानजी : यात काय संशय महाराज.. आपण अति हुशार आहात.. आपल्या राज्याची महती देशोदेशी पसरते आहे.. कीर्तीचा सुगंध जगभर दरवळतो आहे..

महाराज : प्रधांजी आम्ही तुमच्यावर खूश आहोत आणि आमच्यामुळेच हे राज्य नीट सुरू आहे

प्रधानजी : खरंय महाराज

महाराज : आता आमची विश्रामाची वेळ झाली.. राज्यावर नजर तुम्ही ठेवालच.. तेव्हा दरबार बरखास्त..

दरबारी : महाराजांचा विजय असो..

महाराज दरबारात येतात.. हातात तेच कागदी फूल.

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती वक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे.. जब तक सूरज चांद रहेगा चक्रमादित्य का राम रहेगा..

महाराज सिंहासनावर बसतात.. शिपाई झटकन एअर फ्रेशनरचा फवारा मारतो. महाराज दीर्घ श्वास घेतात.

महाराज : वा! काय सुवास!

महाराजांची नजर दरबारावर फिरते.. सगळे एकाच प्रकारचे कपडे.. म्हणजे गणवेश घालून हजर आहेत.. महाराज सोडून..

महाराज : आमच्या आदेशाची त्वरित अंमलबजावणी झाली.. आम्ही खूप खूश आहोत

प्रधानजी : थ्यांक्यू महाराज..

महाराज : प्रधांजी, सेनापती आणि अन्य दोन मंत्री दिसत नाहीत..

प्रधानजी : महाराज ते नवीन गणवेश न मिळाल्याने येऊ शकले नाहीत..

महाराज : न मिळाल्याने?

प्रधानजी : होय महाराज.. शिंपी लोक दिवस रात्र कपडे शिवत आहेत.. आम्ही सर्वांना एकाच मापाचे कपडे घालण्याचा आदेश काढला.. त्यानुसार सर्वांनी तसे घातले कपडे.. कोणास ते अति ढगळ होतात.. कोणास घट्ट.. पण

महाराज : बोला प्रधांजी..

प्रधानजी : पण अति धिप्पाडांना ते कपडे होऊच शकत नाहीत.. त्यामुळे.. आपला आदेश एकाच गणवेशाचा होता.. त्यात अंमलबजावणी खात्याने एकाच मापाचे कपडे घालावेत असेही कलम जोडले..

महाराज : तोफेतोंडी द्या..

प्रधानजी : कोणास? प्रत्यक्ष सेनापतींस? अंमलबजावणी मंत्र्यांस..

महाराज : नाही.. त्या शिंपायास अथवा त्या आदेशाची प्रत ज्याने काढली त्या कारकूनास

प्रधानजी : जो आज्ञा हुजूर.. दोघांनाही दिली तर?

महाराज : अधिकस्य अधिकं फलं.. शिस्त.. न्याय.. आम्ही चतुर आहोत.. चाणाक्ष आहोत..

प्रधानजी : आणि अति हुशार.. महाराज आपल्यामुळेच हे राज्य सुरू आहे..

महाराज : आम्ही अति प्रसन्न आहोत प्रधांजी..

प्रधानजी : एक थोडीशी. लहानशी छोटीशी विनंती करावयाची होती महाराज.. अभय असल्यास..

महाराज : आपणास सदैव अभय असते प्रधांजी.. बोलावे..

प्रधानजी : महाराज हे एक मापाचे गणवेश सगळे अति आनंदाने घालत आहेत.. त्यामुळे एकी वाढत आहे.. सर्व अति खूश आहेत.. पण..

महाराज : पण काय प्रधानजी?

प्रधानजी : लहान मुलांना हे अगदीच मोठे होत आहेत.. नवजात बालकास तर त्यात गुंडाळणे कठीण होत आहे.. मोठमोठ्या कपड्यांत मुले बुजगावण्यासारखी फिरत आहेत.. तेव्हा..

महाराज : खामोश.. ! आमचा आदेश तो परमेश्वराचा आदेश.. पण आम्ही एक थोडा बदल करू शकतो.. नवीन आदेश काढा.. सर्व दरबारी.. उच्चपदस्थ.. उद्योगपती आणि अतिमहनीय व्यक्ती.. तसेच अति धनवान.. आपल्या मापाचे कपडे घालू शकतात.. एकीची गरज सामान्य नागरिकांस आहे.. या सर्वांना नाही..

प्रधानजी : नवीन सुधारित आदेश काढतो महाराज.. त्वरित आदेश निघेल महाराज

महाराज : शाबास प्रधांजी.. सुधारित आदेश अजून सुधारित करावा.. या सर्वांस हवे ते कपडे घालण्याची सूट आहे.. यांस गणवेशाची गरज नाही.. एकीची गरज सामान्यांस आहे..

प्रधानजी : सुधारित आदेश अजून सुधारून काढतो महाराज..

महाराज : आम्ही तुमच्या अति वेगवान कामावर प्रसन्न आहोत प्रधांजी..

प्रधानजी : थ्यांक्यू महाराज

महाराज : आज कोणास तोफेतोंडी?

प्रधानजी : आधीच दोघांचा आदेश निघालाय महाराज

महाराज : होय.. विसरलो आम्ही.. अति कामाचा शिणवटा येतो.. पण आम्ही विश्रांती नाही घेणार..

प्रधानजी : होय महाराज.. आम्ही सर्व नागरिकांस कळवण्याची व्यवस्था केली आहे महाराज.. की आपण रोज अठरा तास काम करता.. विश्रांती नाही.. अथक परिश्रम..

महाराज : शाबास! ही कल्पना ज्याने काढली त्यास तुमच्या गळयातील हार बक्षिस म्हणून देऊन टाका प्रधांजी..

प्रधानजी : क्षमा महाराज.. आपल्या गणवेशाच्या आदेशानुसार कोणी गळयात हार घालू शकत नाही.. आणि हा आदेश आम्हीच काढलेला..

महाराज : अजून सुधारित काढा.. आदेश.. नवीन आदेशानुसार.. त्या सर्व गणवेशातून सूट मिळालेल्यांस दागिने घालण्याची सूट देण्यात येईल.. हे सर्व आपली रत्ने आहेत.. तेच बिन दागिन्यात?

प्रधानजी : सुधारित आदेश अजून सुधारित करतो महाराज.. हुकुमानुसार.. पण आमच्या त्या हाराच्या बक्षिसाचे..

महाराज : आम्ही तोच विचार करीत आहोत प्रधांजी.. गणवेशाच्या आदेशानुसार आता प्रजाजनांस दागिन्यांची गरज नाही.. आदेश काढा.. सर्व दागिने

सरकार दरबारी जमा करा.. ताबडतोबीने.. त्यातील एक प्रधांजींस बक्षिस..

प्रधानजी : होय महाराज.. काढतो आदेश.. सुधारित सुधारित..

महाराज : आमच्या अठरा तासांपैकी किती तासांचे कामकाज आटोपले प्रधांजी?

प्रधानजी : तसे काही नाही महाराज.. आपण दरबारात असलात की नसलात.. आपले मन या राज्यातच गुंतलेले असते.. निद्रावस्था वगळता.. तेव्हा अठरा तास दरबारात राहण्याची आवश्यकता नाही महाराज..

महाराज : शाबास प्रधांजी.. ! म्हणजे आम्ही हा दरबार बरखास्त करू शकतो?

प्रधानजी : आपल्या इच्छेनुसार महाराज.. आणि आपण खूपच शिणलेले दिसत आहात महाराज

महाराज : होय.. आम्ही चतुर.. हुशार.. आणि काय.. प्रधांजी.. ?

प्रधानजी : चाणाक्ष.. महाराज

महाराज : शाबास!

प्रधानजी : आणि आपल्यामुळेच हे राज्य नीट चालत आहे..

महाराज : दरबार बरखास्त!

दरबारी : महाराजांचा विजय असो!

महाराज दरबारात येतात.. हातात तेच कागदी फूल.

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती वक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे..

जब तक सूरज चांद रहेगा

चक्रमादित्य का राम रहेगा..

महाराज सिंहासनावर बसतात.. शिपाई झटकन एअर फ्रेशनरचा फवारा मारतो. महाराज दीर्घ श्वास घेतात.

महाराज : वा! काय सुवास! प्रधांजी.. कामकाजास सुरूवात करा

प्रधानजी : हुकूम महाराज.. पण आपण ते कागदी फूल.. अजूनही?

महाराज : हा आमचा बचतीचा प्रयोग आहे प्रधांजी.. दररोज नवीन फुलाचा खर्च? नाही. आम्ही राज्याची संपत्ती वाचवणार.. लोकांनी प्रेमाने दिलेले धन या फुलांवर उधळलेले आम्हांस नाही मंजूर..

प्रधानजी : महाराज आपण महान आहात.. रोज एकच फूल.. आपल्या प्रजाजनांस हे कळावयास हवेच.. याची माहिती आम्ही सर्व प्रजाजनांपर्यंत दूरवर पोहोचेल अशी व्यवस्था आम्ही करतो महाराज

महाराज : आम्ही फार प्रसन्न आहोत.. राज्याची काय हालहवाल?

प्रधानजी : सर्व काही सुखी समाधानी महाराज.. आपल्या आदेशानुसार.. आपल्या खजिन्यात नागरिकांचे दागिने येऊन पडले आहेत.. अजून येत आहेत.. गणवेशाने एकी आहे.. सुखी असल्याने सगळे मजेत आहेत.. भांडण तंटा नाही.. नागरिकांनी संपत्तीचा त्याग केल्याने त्यांना अत्यंत स्वर्गीय आनंद प्राप्त होत आहे.. चोऱ्या कमी होत आहेत.. हे सर्व एका गणवेशामुळे..

महाराज : आम्ही खूप खूश आहोत.. आमच्या हुशारीने आमची प्रजा खूश आहे.. पण एका बाबीकडे लक्ष ठेवा प्रधांजी..

प्रधानजी : कुठली महाराज?

महाराज : आता सोनेनाणे काही थोड्यांकडे राहिल.. तेव्हा त्यांना चोराचिलट्याचे भय अधिक.. तेव्हा त्यांच्या सुरक्षेत वाढ करा..

प्रधानजी : होय महाराज.. जो हुकूम..

महाराज : आणि आपल्या खजिन्यातल्या भरीमुळे आपल्या सर्व दरबाऱ्यांचे वेतन वाढविण्याचा विचार करता येईल..

प्रधानजी : हुकूम महाराज.. लवकरच तसे होईल महाराज.. आणि आपल्या खिदमतीत बाहेरील देशांतून उच्च प्रतीचे तांदूळ मागवावेत असा मानस आहे.

महाराज : आम्ही प्रसन्न आहोत.. आम्ही आहोत म्हणून हे राज्य चालले आहे..

प्रधानजी : खरंय महाराज.. एक छोटीशी विनंती महाराज.. अभय असल्यास..

महाराज : आपणास सदैच अभय असते प्रधांजी.. बोलावे.. गणवेशाबद्दल प्रजेत काही.. ?

प्रधानजी : नाही महाराज नाही.. प्रजेत तक्रार नाही.. आपल्या आदेशानुसार. पण काही.. म्हणजे ज्यास गणवेशांतून मुभा दिली त्यांची काही तक्रार आहे..

महाराज : बोला प्रधांजी.. आमच्या या रत्नांस कसली तोशिस आमच्या राज्यात?

प्रधानजी : दररोज आपणा सर्वांस एकच एक जेवण ठरवून दिले आहे..

महाराज : त्यामुळे एकी वाढेल.. असाच आमचा आदेश होता..

प्रधानजी : यातून या सगळयांना सुटका देण्याची विनंती आहे महाराज..

महाराज : का नाही? ह्या साऱ्यांस एकीची गरज नाही.. ती सामान्यांस आहे.. तेव्हा आदेश काढा.. हे सर्व हवे ते खाऊ शकता. सामान्य प्रजेस मात्र जुना आदेश तसाच लागू राहिल..

प्रधानजी : सुधारित सुधारित आदेशात अजून सुधार करतो आपल्या हुकुमानुसार महाराज : आणि प्रजेवर बारीक नजर ठेवा.. त्यांच्या स्वयंपाकघरात काय शिजते यावर बारीक नजर हवी

प्रधानजी : होय महाराज.. स्वयंपाकाबरोबरच आपल्या विरोधात काही शिजते का यावर ही..

महाराज : बरोबर प्रधांजी.. आम्ही म्हणजे राज्य.. आम्हांस विरोध म्हणजे राज्यास विरोध.. आदेशास विरोध म्हणजे देशास विरोध..

प्रधानजी : आम्ही हे प्रजाजनांस कळवतो महाराज.. आपल्या सैनिकांस कोणाचेही स्वयंपाकघर तपासण्याचा अधिकार दिला जाईल असा आदेश काढतो महाराज..

महाराज : शाबास.. प्रधांजी.. तुम्ही अत्यंत जलद काम करता..

प्रधानजी : होय महाराज.. आम्ही आधी आदेश काढतो.. मग विचार करतो महाराज.. पुन्हा सुधारित आदेश काढता येतातच..

महाराज : पण हे राज्य..

प्रधानजी : आपल्यामुळेच नीट चालू आहे महाराज.. आपण चतुर.. चाणाक्ष..

महाराज : आणि हुशार...

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : पण आजचा तोफेतोंडीचा हुकूम राहिला प्रधांजी.. आमच्या न्यायदानाचे काय होईल?

प्रधानजी : आपला हुकूम महाराज.. आपण कोणाची निवड कराल त्याचे भाग्य..

महाराज : आपल्या कायदेमंत्र्यांनी अजिबात आपले कर्तव्य निभावलेले दिसत नाही प्रधांजी..

कायदेमंत्र्यांनीच तोफेतोंडी जातात की काय? प्रधानजी चिंतेत पडतात..

महाराज : आणि आज आम्ही न्यायदान कसे करणार याच्या चिंतेत आहोत आम्ही त्यामुळे

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : हे काही नाही.. तोफेतोंडी द्या..

प्रधानजी : कोणास महाराज?

महाराज : आपल्या कायदेखात्यातील सर्वात कनिष्ठ कारकूनास.. त्याच्या निष्काळजीपणामुळे ही वेळ आलीय..

प्रधानजी : जो हुकूम महाराज..

महाराज : आमच्या परदेशातील भाताचे काय झाले.. आमचे बारीक लक्ष होते.. काल आम्हास देशी भात खावा लागला..

प्रधानजी : क्षमा महाराज.. आयातीची ऑर्डर गेली आहे.. त्यास थोडा समय.. विलंब नाही.. थोडा समय लागेल महाराज..

महाराज : ठीक आहे पण अधिक विलंब आम्हास सहन होत नाही.. आमचे सर्वकाही जलद.. अति जलद.. आम्ही चतुर.. जलद.. अति जलद.. आणि आम्ही चतुर.. चाणाक्ष.. हुशार..

प्रधानजी : आपल्यामुळेच हे राज्य नीट चालू आहे महाराज..

महाराज : आजचे कामकाज.. आम्ही या देशाच्या चिंतेने व्याकूळ आहोत.. काल तो देशी भात आमच्या गळ्याखाली उतरेना.. दिवसेंदिवस आम्हास निद्रा नाही.. रात्रीचीच काय ती झोप..

प्रधानजी : तब्येत बरी आहे ना महाराजांची? वैद्यांस.. बोलावणे.. ?

महाराज : नाही.. फक्त आमची तब्येत नाजूक असतानाही देशकार्यास..

प्रधानजी : समजले महाराज.. देशवासियांना ही बातमी पोहोचवण्याची आम्ही व्यवस्थित व्यवस्था करतो महाराज..

महाराज : शाबास.. तुमचा. अभिमान वाटतो आम्हास..

प्रधानजी : थ्यांक्यू महाराज.. आम्हाला वाटते शिणवटा महाराजांच्या चेहऱ्यावर दिसत आहे.. महाराजांनी थोडा विश्राम घ्यावा..

महाराज : ते पोशिंदावाले वाक्य म्हणावे प्रधांजी.. मग आम्ही सुखाने नवीन जोमात येण्यासाठी विश्राम करू

प्रधानजी : लाख मेले तर चालतील.. पण लाखांचा पोशिंदा वाचला पाहिजे..

महाराज : वा! तृप्त कानांनी आम्ही निघतो.. दरबार बरखास्त..

दरबारी : महाराजांचा विजय असो!

महाराज दरबारात येतात.. हातात तेच कागदी फूल.

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती वक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे.. जब तक सूरज चांद रहेगा चक्रमादित्य का राम रहेगा..

महाराज सिंहासनावर बसतात.. शिपाई झटकन अत्तर शिंपडतो. त्यातील दोन थेंब महाराजांच्या कपड्यावर पडतात.. महाराज दीर्घ श्वास घेतात.

महाराज : अतिउत्तम शिपाई!

शिपाई जीवास मुकतो की काय अशा भीतीने प्रधानजी लगेच म्हणतात,

प्रधानजी : काही चुकले का शिपायाचे महाराज?

महाराज : नाही.. अत्तर सुरेख आहे.. प्रधांजी.. कामकाजास सुरूवात करा

प्रधानजी : हुकूम महाराज.. खास कनौजमधून आपणासाठी आणलेला अत्तराचा साठा आहे महाराज.. आपल्या खजिन्यातील काही मुद्रा खर्चून.. आपल्या फुलात मात्र बचत होत आहेच..

महाराज : बचत हा आमचा मंत्र आहे..

प्रधानजी : होय महाराज.. कालच आम्ही देशभर आपल्या बचतीबद्दल गुणगान गाणारे संदेश पसरविले आहेत..

महाराज : आम्ही फार प्रसन्न आहोत.. अजून नवीन खबरबात?

प्रधानजी : आपल्या एक वेश आदेशाने महाराज, राज्यात सुबत्ता नांदत आहे.. खजिना भरलेला आहे.. भांडणे..

महाराज : हे तुम्ही काल सांगितले.. आज नवीन गुणगान करा.. आम्ही चतुर आणि चाणाक्ष..

प्रधानजी : आणि तुमच्यामुळेच हा राज्यशकट नीट हाकला जातोय..

महाराज : शकट? हे काय नवे प्रधांजी?

प्रधानजी : राज्याचा रथ महाराज..

महाराज : वा! हा शब्द नेहमी वापरत चला.. असा आमचा हुकूम आहे..

प्रधानजी : जी महाराज.. राज्यशकट..

एक शिपाई एका इसमास पकडून आणतो.. सामान्य असल्याने गणवेशात आहे.. तरूण आहे पण किडकिडीत.. खपाटीस गेलेले पोट.. आणल्या आणल्या पडतो..

महाराज : कोण हा इसम? आपल्या सुखी राज्यातला नाही दिसत..

प्रधानजी : आपल्याच राज्यातील.. तोही सामान्य.. गणवेशावरून दिसतेच आहे.. पण एक दु:खी माणूस आहे महाराज.. देशद्रोहाच्या आरोपाखाली पकडलाय महाराज

महाराज : दु:खी? म्हणजे राजद्रोह.. देशद्रोह.. ! कोणता गुन्हा केलाय याने?

प्रधानजी : आपल्या राज्यात सुखी असण्याचा आदेश याने धुडकावलाय महाराज..

महाराज : म्हणजे हा सुखी नाही.. बोल तुला काय बोलायचेय?

तो काही बोलण्याआधी उठण्याचा प्रयत्न करतो.. धडपडत पुन्हा पडतो.. बोलण्याचा प्रयत्न करतो पण आवाज फुटत नाही

महाराज : काही ऐकायचे नाही तुझे.. एक शब्द बोलू नकोस..

प्रधानजी : याने गेल्या काही दिवसात काही खाल्ले नाही महाराज.. अतिशय गलितगात्र असा हा.. शिपायांनी पकडला म्हणून बरे.. आपल्या सुखी राज्यात दु:खी आत्मा..

महाराज : देशद्रोहास या राज्यात एकच सजा.. प्रथम कडेलोट करा.. नंतर तोफेतोंडी द्या.. त्यानंतर वाचल्यास हत्तीच्या पायी द्या..

प्रधानजी : जो हुकूम महाराज.. पण एकदा याचे ऐकून घेतले असते महाराज..

महाराज : खामोश! देशद्रोह्यास आमच्या राज्यात क्षमा नाही.. एकदा आम्ही देशद्रोही ठरवले की आम्ही कोणाचे ऐकून घेत नाही.. त्यास बोलण्याची परवानगी नाही.. आम्ही ठरवतो ती काळ्या दगडावरची रेघ!

प्रधानजी : जी हुजूर.. आपल्या हुकुमाची अंमलबजावणी होईल..

महाराज : ठीक प्रधानजी..

प्रधानजी : एक विनंती महाराज.. हा अर्धमेला आहे.. यास कडेलोट करण्याआधीच याचे काही बरेवाईट झाले तर? यास थोडे खाऊ घातल्यास आपल्या दयाळूपणाची नि कर्तव्यपालनाची कथा सात पिढ्या ऐकवली जाईल.. तेव्हा यास..

महाराज : आपल्या दूरदृष्टीचे आम्हास कौतुक वाटत आले आहे प्रधांजी.. यास तो देशी भात खाऊ घाला.. धुगधुगी आली की कडेलोट करा..

प्रधानजी : थ्यांक्यू महाराज..

शिपाई त्या इसमास घेऊन जातात..

महाराज : आम्ही विषण्ण झालो आहोत.. आमच्या देशात दु:खी आत्मा कोठून आला.. आम्ही आदेश दिला आहे.. सारे कसे सुखी असायलाच हवे.. आमचा आदेश तोडणारा.. पापी.. द्रोही.. यास एकच शिक्षा.. आम्ही कर्तव्यकठोर.. न्यायनिष्ठुर..

प्रधानजी : आणि हुशार.. चतुर.. चाणाक्ष.. तुमच्या मुळेच हा राज्यशकट व्यवस्थित चाललाय महाराज..

महाराज : छान.. राज्य.. शकट.. आम्हास वाटते आमच्या कामकाजास स्थगिती द्यावी.. तो परदेशी तांदूळ पोहोचला असेल ना?

प्रधानजी : आम्ही जातीने लक्ष देऊन आहोत महाराज.. आपण विश्राम करावा.. आपल्यामागे राज्याची चिंता वाहणे आहे.. आपणास विराम नि विश्राम दोघांचीही नितांत आवश्यकता आहे.. प्रजाजनांस आपण अठरा तास कशी चिंता वाहता हे आम्ही ठसवून सांगितले आहे.. तसे संदेश राज्यभर पसरविले आहेत.. तेव्हा..

महाराज : आपण म्हणता तर दरबार बरखास्त करूया.. दरबार बरखास्त.. !

दरबारी : महाराजांचा विजय असो!

महाराज दरबारात येतात.. हातात एक खरेखुरे फूल.

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती चक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे..

जब तक सूरज चांद रहेगा

चक्रमादित्य का नाम रहेगा..

शिपायाच्या लक्षात ते खरेखुरे फूल येत नाही. तो डिओडरंट घेऊन त्या फुलावर मारायला येतो. महाराज संतापतात..

महाराज : खबरदार..

शिपाई दचकून मागे जातो.

प्रधानजी : माफी असावी महाराज.. आपले ते आधीचेच फूल असल्याचा समज झाल्याने..

महाराज : प्रधांजी.. आमच्या काटकसरीचे संदेश आतापर्यंत पोहोचले असतील.. आता त्या फुलावरून नवीन संदेश तयार करा.. तुम्हास न जमले तर चरणदासाकडून लिहून घ्या.. त्यांना जमत नसेल तर बंदुकीच्या धाकावर लिहून घ्या..

प्रधानजी : आम्ही आपल्या नवीन संदेशाची व्यवस्था करतो महाराज.. चरणदासाकडून लिहून घेऊ..

महाराज : ठीक.. राज्याची काय हालहवाल?

प्रधानजी : सर्व काही सुरळीत.. आपल्या राज्यातील सैनिकांस झुरळे पकडण्यास धाडले होते.. ते काम तडीस जाण्यास आले आहे.. लवकरच आपले राज्य झुरळमुक्त होईल.. त्यांना आता मच्छरांवर हल्ला करण्याचे आदेश सेनापती देणार असल्याचे कळते..

महाराज : शाबास! झुरळे माशा.. मच्छरांसंगे युद्ध आमचे सुरू..

प्रधानजी : जिंकू किंवा मरू.. जिंकू किंवा मरू..

महाराज : मरू? जिंकूच.. अजून नवीन खबरबात? बात.. भात.. भातावरून आठवले.. परदेशातील तो सुवासिक तांदूळ.. अति उच्च प्रतीचा आहे.. अजून मागवून घ्या..

प्रधानजी : जी महाराज..

महाराज : थोडा दानधर्म करण्याची इच्छा आहे प्रधांजी..

प्रधानजी : महाराज.. आपण महान आहात.. ज्ञानी आहात.. दानी आहात..

महाराज : आपल्याकडील जुना देशी तांदूळ.. त्यास जनतेत वाटून टाका.. आम्हास जनतेचा दुवा घ्यावयाचा आहे.. जनतेस तृप्त मानाने जगताना पहावयाचे आहे..

प्रधानजी : महाराज आपल्या दातृत्वाच्या कथा देशोदेशी पसरतील.. अशी आम्ही जातीने व्यवस्था करतो..

महाराज : आम्ही प्रसन्न आहोत.. कालप्रमाणे येथे कोणी दु:खी आत्मा येऊ देऊ नका.. त्या दु:खी जीवास पाहून रात्रभर आम्ही पंधरा मिनीटे तळमळत होतो.. ती आम्ही कशी काढली ते आमचे आम्हीच जाणतो.. शेवटी राणीसरकारांनी विदेशी पेयपान करविले तेव्हा कोठे निद्रादेवी प्रसन्न झाली..

प्रधानजी : महाराज.. राज्याची इतकी चिंता करू नये.. तब्येतीस हानी पोहोचेल.. आपणास तर ठाऊक आहे.. लाख गेले तर चालतील.. पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे. महाराज.. आपण विश्राम कराचा..

महाराज : नाही.. आम्हास तो राज्यसंकट.. हाकायचाय

प्रधानजी : क्षमा असावी.. राज्यशकट महाराज..

महाराज : आम्ही संकटाचा मुकाबला करीत हे राज्य उभारले.. दानी अशी आमची ख्याती. तेव्हा संकट नि शकट.. आम्हास एकच.. तर राज्य श.. क.. ट.. हाकायचाय तर विश्राम करून कसे चालेल.. आम्हास कार्यरत रहावेच लागेल..

प्रधानजी : जो हुकूम महाराज.. नवीन योजना.. आपल्या सैनिकांच्या हातास काम असावे म्हणून घाटत आहे मनात.. आज्ञा असेल तर सांगतो..

महाराज : जरूर बोलावे प्रधांजी.. आम्ही ऐकत आहोत..

प्रधानजी : आपण एक वेश.. एक भोजनाचे आदेश काढले आहेत.. त्यांची अंमलबजावणी प्रजाजन आनंदाने करीतच आहेत.. एकूण सुख वाढत आहे.. तरीपण..

महाराज : बोल प्रधानजी.. अडखळू नका.. आम्ही मन घट्ट करून ऐकत आहोत.

प्रधानजी : आमचा संशय आहे काहीजणांवर.. ते देशद्रोही मनातून महाराजांच्या हुकुमाचा अनादर करत असावेत..

महाराज : हे आमच्या राज्यात होऊ शकत नाही.. या राज्यात असे लोक राहूच शकत नाहीत.. कालच्या प्रकारानंतर हा अजून एक धक्का.. प्रधांजी..

प्रधानजी : महाराजांनी चिंता करू नये.. आम्ही या प्रकाराचा समूळ बंदोबस्त करण्याची योजना आखीत आहोत.. त्यानुसार आपले सैनिक घराघरात शिरून सर्व एक वेश घालतात की नाहीत ते पाहतील.. त्यांच्या स्वयंपाकघरात एकच अन्न शिजते हे ही पाहतील.. जे चुकतील त्यांस ताबडतोबीने पकडून हजर केले जाईल.

महाराज : शाबास! कोणताही विरोध हा मुळापासूनच खुडावा लागतो.. आम्ही तारणहार.. आमच्या आदेशाच्या विरूद्ध.. द्रोह? कदापि सहन करणार नाही..

प्रधानजी : महाराजांनी चिंता करू नये.. आम्ही बंदोबस्त करतो.. तूर्तास त्या मच्छरविरोधी सैनिकांस आम्ही त्या कामास लावले जावे अशी विनंती आहे..

महाराज : अर्थात.. हे कार्य जास्त महत्वपूर्ण आहे.. राज्याच्या भविष्याचा सवाल आहे.. ही विषवल्ली ठेचावी..

प्रधानजी : हुकूम महाराज..

महाराज : ऐकावे आमचे.. आमचे स्वप्न आहे एक समान देश.. जिथे सारे एक सारखे असतील.. एक समान दिसतील.. एकच भाषा बोलतील.. एकच गाणे गातील.. आणि एकच.. म्हणजे आमचे आदेश मानतील.. असल्या देशाच्या आमच्या स्वप्नात असले क्षूद्र आढळले.. नाही खपवून घेणार आम्ही.. कदापि.. नाही..

प्रधानजी : महाराज.. आपले उदात्त ध्येय.. त्यासाठीची तळमळ.. त्यासाठी कष्ट करवून घेण्याची पद्धत.. आम्ही पाहात आहोत.. आमच्या सैनिकांस आम्ही तुमचे स्वप्न सांगू.. म्हणजे ते आपल्या द्रोह्यास.. म्हणजे देशद्रोह्यांस त्वेषाने जेरबंद करतील..

महाराज : शाबास! आमची हीच अपेक्षा आहे.. आम्ही चतुर.. हुशार.. चाणाक्ष..

प्रधानजी : आपण आहात म्हणून हा राज्यशकट ओढला जातोय व्यवस्थित महाराज..

महाराज : आजचे कामकाज लांबले.. आम्हास चिंतनास समय हवा.. तेव्हा आता दरबार बरखास्त करावा..

प्रधानजी : हुकूम महाराज

महाराज : दरबार बरखास्त..

दरबारी : महाराजांचा विजय असो!

महाराज दरबारात येतात...

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती चक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे..

जब तक सूरज चांद रहेगा

चक्रमादित्य का नाम रहेगा..

महाराज सिंहासनावर बसतात. हातात आज फूल नाही. एक एअर फ्रेशनरचा पॅक उघडून पकडलेला. महाराज दीर्घ श्वास घेतात.

महाराज : वा! काय सुवास!

प्रधानजी : असाच सुगंध महाराज अजून एका गोष्टीचा दरवळतोय जगभरात. आपल्या कीर्तीचा.. दातृत्वाचा.. नेतृत्वाचा.. रयतेप्रती पितृत्वाचा..

महाराज : वा! हा संदेश तुम्ही लिहून घेतलाय? सुंदर.. आणि तो रयत शब्द ही छान आहे.. वापरत चला अधून मधून

प्रधानजी : होय महाराज.. चरणदास कवी लीन यांना कैदेत ठेऊन आपण एक कवी पदरी बाळगला आहे. आम्ही त्यास आज्ञा केली आहे.. रोज एक काव्य प्रसूत व्हावयासच हवे. नाहीतर बंदुकीच्या धाकाने आम्ही ते लिहून घेऊ त्याच्याकडून..

महाराज : आजचे काव्य सुंदर आहे. आज चरणदासाचा डावा हात बेडीतून मोकळा सोडावा.. बेड्या एकाच हातात ठेवाव्यात.

प्रधानजी : हुकूम महाराज.. आणि हा संदेश राज्याच्या कोपऱ्याकोपऱ्यात पोहोचेल अशी व्यवस्था करतो आम्ही महाराज.

महाराज : आम्ही खूप प्रसन्न आहोत.. आज आम्हास अगदी प्रसन्नतेचा अनुभव येत आहे.. काल तो विदेशी तांदूळ.. विदेशी पेय.. दानधर्म.. देशकालाबद्दलचे मूलभूत चिंतन.. आम्ही तृप्त आहोत.. आम्ही तृप्त म्हणजे प्रजा तृप्त.. अशात आज कोणतीही समस्या आमच्यापुढे आणू नका प्रधांजी.. आमचा आजचा दिवस कसा सुंदर व्हावा..

प्रधानजी : जो आज्ञा महाराज.. आम्ही सर्व उद्यावर ढकलून आजचा दिवस सुखी बनवू.. आज महाराजांस फक्त सुंदर तेच ऐकवू.. आज्ञा असेल तर.. चरणदासांकडून लिहवून घेतलेल्या काही पंक्ती आपणास ऐकवू महाराज? तद्नंतर आपल्या राज्यातील लोककलाकार खास आपल्या भेटीस आतुर होऊन आलेले आहेत.. त्यांस आपली कला सादर करू देण्याची आज्ञा असेल तर..

महाराज : अर्थात.. कला.. त्यातही लोककला आम्ही उत्तेजनच देऊ इच्छितो त्यांस.. कित्येक कलावंतिणींस आम्ही आजवर आधार दिला आहे.. तेव्हा आज लोक कलांना.. म्हणून त्यांचा कार्यक्रम आम्ही जातीने बघू.. त्या आधी चरणदासास काय म्हणावयाचे ते ऐकवा..

प्रधानजी : होय महाराज.. चरणदास लिहितो..

श्री राजाधिराज चक्रमादित्य चालिसा.. ऐकावी महाराज.. हे एक चाळीस ओळींचे काव्य.. ज्यास महाराजांच्या नावाचा अंगभूत सुगंध आहे..

गान करोनी भान हरपले
गुण वर्णावे किती
धन्य धन्य तो राजेश्वर
चक्रमपुरी नृपती..

प्रजाहित अन देश हित हा
असतो तुमचा धर्म
कर्मयोगी करी कर्म धर्म
हे राजाचे वर्म

बोलत नसती कुणी इथे अन
दाखवीत करूनी कर्म
काम झोकूनी करवून घेई
कुणी न वाचवी चर्म

एक कराया राज्य देश

एक कराया वेश

यत्न कितीही न कसर सोडीशी

एक राज्य नि:शेष

तुच गा दानी तुच गा ज्ञानी

मानी असशी तूच

शत्रू संगे लढण्या

करीशी अश्वावरूनी कूच

हात जोडूनी वंदीन यांना

झुकवुनिया मान ती

चाटू आम्ही तव चरणे ही

या वाचून नाही गती

तू नृपती तू भूपती

तू प्रति परमेश्वर

सर्व चराचर कैसा जाईल

म्हणून अवतारी तू ईश्वर

शौर्यकथा या तुझ्या लाख त्या

सूर्यालाही झाकून टाकी

चंद्राहून ही शीतल तुम्ही

न कामाचे बाकी

राजराजेश्वर नच तू

द्वितियावतारी तू ईश्वर

कोण तुझ्याविण बालक असला

मी तो एक नश्वर

इति श्री चक्रमादित्य स्तुती चालिसा संपूर्णम.

.

महाराज : वा! चरणदास अत्यंत सुरेख अन कसदार, रसदार काव्य लिहीतात.. आज आम्ही खूश आहोत.. चरणदासांना कैदेतून मुक्त करा.. आणि दरबारात हजर करा..

प्रधानजी : जो हुकूम महाराज

शिपाई चरणदासास घेऊन येतात. हातातील बेड्या काढून चरणदास निर्विकार उभा..

महाराज : यावे.. यावे कविराज. अत्यंत प्रतिभाशाली कवी... तुम्ही आजपासून मुक्त.. परंतु तुम्हास येथेच रहावे लागेल आणि असेच काव्य.. महाकाव्य लिहावे लागेल.. मंजूर.. ?

चरणदासास एका क्षणात महाराजांच्या नियमाचा विसर पडतो. कैदेतून मुक्तता म्हणताच हरखून जातो..

चरणदास : अत्यंत आभारी महाराज.. आपल्या चरणांशी बसून मी काव्यफुले उमलवीत राहीन.. काव्यतुषार उडवीत राहीन.. काव्य कमळे या बगीच्यात फुलवीत राहीन.. काव्य पक्षी..

महाराज : खामोश! ही जुर्रत तुझी.. आमच्या दरबारात आवाज फक्त आम्ही आणि प्रधांजींचा. तुझी बोलण्याची हिंमत झाली कशी? या गुन्ह्यास एकच सजा.. यास तोफेतोंडी द्या.. आजचे न्यायदान बाकी आहे..

प्रधानजी : अभय असल्यास एक विनंती महाराज..

महाराज : आपणास अभयच असते प्रधांजी.. बोलावे

प्रधानजी : चरणदासासारखे प्रतिभावान आपल्या कैदेत असल्याने काव्यशास्त्र विनोदेन.. प्रगतीचे संदेश पाठवता येतात.. आपली सुसंस्कृत प्रतिमा उभारणीत हे कामाचे आहेत.. कैदेत असल्यानेच.. तेव्हा तोफेतोंडी देण्यास कुण्या दुसऱ्याची निवड करावी.. आणि यास परत कैदेत पाठवणे उचित होईल महाराज..

महाराज : आपण म्हणता त्यात तथ्य आहे प्रधांजी.. जा चरणदासास परत कैदेत टाका..

प्रधानजी : जो हुकूम महाराज..

शिपाई चरणदासास घेऊन जातात.

महाराज : आम्ही आता फार शिणून गेलो आहोत.. आज तोफेसही विश्रांती.. आता आम्ही लोककलाश्रयास चाललो.. तेव्हा दरबार बरखास्त..

सर्व दरबारी : महाराजांचा विजय असो!

महाराज दरबारात येतात..

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती चक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे.. जब तक सूरज चांद रहेगा चक्रमादित्य का नाम रहेगा.. आलमगीर.. जहांपनाह.. सलामे आलेकूम.. राजा ए चक्रमपूर.. मालिक ए दौलत.. समाज ए बदौलत.. राजाधिराज पधार गए हैं.. फिरसे एकबार निगाह रखो..

महाराजांच्या हातात तोच एअर फ्रेशनर..

महाराज : प्रधांजी, ही नवी घोषणा सुंदर आहे.. अति सुंदर आहे.. आमच्या राज्याचे वर्णन करणारी आहे.. आम्ही प्रसन्न आहोत.. चरणदासाकडून लिहवून आणलेल्या चार ओळी ऐकवा नि कामकाजास सुरूवात करा..

प्रधानजी : हुकूम सरकार.. ह्या नवीन घोषणेच्या पंक्ती काल आम्ही जातीने लिहून घेतल्या आहेत.. आपणास आवडल्याने त्याचे चीज झाले महाराज..

महाराज : त्या चरणदासाच्या चार ओळी..

प्रधानजी : जी हुजूर.. ऐकाव्या महाराज..

चक्रमादित्याचा आठवे प्रताप

चक्रमाचे आठवावे रूप

जैसे पुरणपोळीवर साजूक तूप

ऐसी ख्याती कैसी असे..

महाराज : वा.. वा! आपले म्हणणे रास्त होते प्रधांजी.. आपणास या कवीची गरज आहे.. सध्या.. निदान दुसरा कवी निपजे पर्यंत..

प्रधानजी : जी हुजूर

महाराज : आपल्या राज्यातील सैनिकांची काय हालहवाल?

प्रधानजी : महाराज.. त्यांच्या शोध मोहिमा सुरू आहेत.. घर अन घर पिंजून काढले जात आहे.. आपल्याबद्दल आदराने फारसे कोणी आदेश तोडत नाहीत..

महाराज : आम्ही प्रसन्न आहोत.. पण आज आमच्या मनात काही और आहे.. आम्हास एक पिढी घडवायची आहे.. त्याची स्वप्ने आम्ही पाहात आहोत..

प्रधानजी : महाराज आपले स्वप्न ते साऱ्या देशाचे स्वप्न.. आपला शब्द कधी खाली पडू दिला जात नाही महाराज.. वरचेवर झेलला जातो..

महाराज : आम्ही एक मूलगामी विचार केला आहे.. आम्हास त्यासाठी नव्या दमाच्या मुलांची गरज आहे..

प्रधानजी : आपला आदेश असेल तर मुसक्या बांधून आणवतो तरूण नवीन रक्ताची मुले..

महाराज : थांबावे प्रधांजी.. पूर्ण ऐकून घ्यावे..

प्रधानजी : क्षमा असावी महाराज..

महाराज : आम्ही एक दूर आणि मूलगामी योजनेचा आराखडा सांगत आहोत.. आम्हाला आमच्या पदरी पुढील वीस ते पंचवीस वर्षे सेवा देतील असे निष्ठावान सेवक हवे आहेत. यासाठी नवी भरती पाच ते दहा वर्षांची मुले.. या वयात ते हवे तसे घडतात.. त्यांना खास राज्यशिक्षण द्यावे आणि काही वर्षांत ते आमच्या चाकरीत येतील..

एकाएकी प्रधानजींना आपल्या नोकरीबद्दल अशाश्वतता वाटून जाते. पण चेहऱ्यावर काही भाव न दाखवता ते महाराजांच्या या योजनेची स्तुती करतात.

प्रधानजी : अत्यंत दूरगामी.. दूरदर्शी महाराज.. आपल्या दृष्टीचे कौतुक आहे महाराज..

महाराज : या सर्वांना एकाच शिकवणूक देण्यात येईल.. फक्त हो म्हणण्यास शिकणे.. आम्हास कोणी नाही म्हणालेले आवडत नाही.. या भावी निष्ठावानांना हो म्हणायला शिकवून आम्ही पदरी ठेऊन ठेऊ.. आमच्या डाव्या उजव्या हाती असलेच हो म्हणणारे तरूण असतील..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : प्रधानजी आम्हास तुमचे हेच आवडते.. तुम्ही लगेच हो म्हणता..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : लवकरात लवकर अशा मुलांना आपल्या राज्यात गुरूकुल उघडून भरती करा.. त्यांच्या शिक्षणात त्यांना फक्त विविध प्रकारांनी हो म्हणायला शिकवा

प्रधानजी : हो महाराज.. आपण चतुर.. हुशार.. चाणाक्ष आहात आपल्यामुळेच हा राज्यशकट व्यवस्थित सुरू आहे..

महाराज : आम्हास आताच स्वप्ने दिसत आहेत.. सर्व पदांवर आमची हो म्हणणारी माणसे.. आम्ही तो राज्यशकट हाकतोय.. वर्षानुवर्षे..

प्रधानजी : हो महाराज.. यावच्चंद्रदिवाकरौ..

महाराज : हा शब्द छान आहे.. राज्यशकटासारखा.. थोडा कठीण आहे.. पण नेहमी वापरत जावे

प्रधानजी : हो महाराज..

महाराज : कालच्या लोककला आश्रयानंतर आम्ही रात्री पंधरा मिनिटे तळमळत काढली.. प्रधांजी.. आम्हास तुमचे ते कोणी विरोध करणारे.. आमच्या राज्यात.. असे काहीतरी अस्वस्थ करीत होते.. मग आम्ही खूप विचारांती या मूलभूत निर्णयापर्यंत पोहोचलो आहोत..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : तो नवा शब्द परत एकदा ऐकवा प्रधांजी..

प्रधानजी : हुकूम.. होय.. महाराज.. यावच्चंद्रदिवाकरौ.. राज्यशकट.. रयतेचा..

महाराज : वा! छान! तेव्हा आम्ही दरबार बरखास्त करीत आहोत..

प्रधानजी : होय महाराज

महाराज : दरबार बरखास्त!

दरबारी : महाराजांचा विजय असो!

महाराज दरबारात येतात..

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती चक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे.. जब तक सूरज चांद रहेगा चक्रमादित्य का नाम रहेगा.. आलमगीर.. जहांपनाह.. सलामे आलेकूम.. राजा ए चक्रमपूर.. मालिक ए दौलत.. समाज ए बदौलत.. राजाधिराज पधार गए हैं.. फिरसे एकबार निगाह रखो..

महाराजांच्या हातात परत कागदी फूल.. सवयीने शिपाई लक्ष न देता बसून राहतो.

महाराज : शिपाई.. आमच्या फुलावर अत्तराचा फवारा? कधी?

शिपाई कापत कापत उठतो, तातडीने अत्तराच फवारा मारतो.

महाराज : प्रधांजी.. आज या शिपायाची रवानगी करा.. बोल तुला काय आवडेल? तोफे तोंडी की कडेलोट?

शिपाई कापत उभा राहतो.

महाराज : प्रधांजी.. आमची मुद्रा आणा.. छापाकाटा करू..

प्रधानजी नाणे उडवतात..

महाराज : पहा.. यास तोफेतोंडी द्या..

दुसरा शिपाई त्या शिपायास घेऊन जातो. दरबारात शांतता..

महाराज : न्यायदानात आमची मुद्रा अशी आम्ही प्रथमच वापरली प्रधांजी

प्रधानजी : होय महाराज, एकूणच न्यायदानावर आपली मुद्रा उमटलेली दिसते आहे महाराज, देशोदेशी आपल्या न्यायाची चर्चा आहे.. आणि चरणदासानी लिहिलेल्या चार ओळी महाराज..

महाराज : ऐकवा..

प्रधानजी : हुकूम महाराज.. ऐकाव्यात महाराजांनी..

धन्य धन्य तू राजा भूपती

तव कीर्तीचा बाजा वाजे किती

महान ऐसा भूतली तू नृपती

गुण गावे सांगावे मी किती.. ?

महाराज : वा! आमचे कान तृप्त झाले.. आता यापुढे काही ऐकू नये..

महाराज दरबार इथेच बरखास्त करतात की काय.. प्रधानजींना शंका येते. तोच शिपाई एक गणवेशातील माणसास पकडून दरबारात आणतात. तो माणूस धडधाकट आहे.. डोळ्यात थोडी मगरूरी..

महाराज : काय अपराध याचा प्रधांजी?

प्रधानजी : महाराजांनी थोडा समय द्यावा, आम्ही सर्व काही विस्तृत विवेचन करतो महाराज..

काही मिनिटे दरबार स्तब्ध.. महाराज त्या कागदी फुलास हुंगत बसतात.

प्रधानजी : देशद्रोह.. महाराज देशद्रोह..

महाराज : अजून एक देशद्रोही? पण हा दु:खी दिसत नाही.. खाऊनपिऊन धडधाकट.. सुखी

प्रधानजी : तेच महाराज.. आपल्या हुकुमानुसार आज देशभर भात नि चवळीची आमटी बनणे आवश्यक.. ती याच्या घरी बनत होती.. पण..

महाराज : पण काय प्रधानजी?

प्रधानजी : पण याने कालच्या जेवणातील काकडीची कोशिंबीर आजसाठी काढून ठेवलेली.. याचा दावा आहे की ती कालची उरलेली.. ती तो खाताना आमच्या शूर सैनिकाने रंगे हाथ पकडले यास महाराज..

महाराज : असला देशद्रोह? कोशिंबीर खाण्याची हिंमत.. ही मजाल.. जा आमच्या डोळ्यांपासून दूर घेऊन जा.. हटवा यास.. आमच्या राज्यात निष्ठा नावाची काही चीज राहिली आहे की नाही?

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : आम्ही जीव आटवतो.. देशाची चिंता वाहतो..

प्रधानजी : होय महाराज.. अठरा तास दरदिवशी..

महाराज : आणि आमच्या राज्यात कोशिंबीर खाणारा माणूस निघावा?.. देशद्रोही..

प्रधानजी : यास कठोर शिक्षा द्यावी महाराज..

महाराज : न्याय हा आमचा प्राण.. आमचा श्वास.. चरणदासास हुकूम द्या यावर काव्य झालेच पाहिजे.. कमीतकमी चार ओळींचे तरी..

प्रधानजी : होय महाराज.

महाराज : आणि त्या निर्लज्ज, पापी, देशद्रोही इसमास तोफेतोंडी द्या.. आम्ही उद्विग्न आहोत.. एक देश बांधण्यासाठी.. एक वेश नि एक भोजन किती जरूरी आहे हे याला कोण सांगणार?

प्रधानजी : होय महाराज

महाराज : पण आजचे न्यायदान झाले याचे समाधान.. तोफेतोंडी जाण्यास मोठी वेटिंग लिस्ट तर नाहीना प्रधांजी?

प्रधानजी : महाराज आपल्या राज्यात न्यायदान इतके जलद असताना तोफेतोंडी जाण्यास प्रतीक्षा ही करावीच लागणार.. पण आपले नागरिक हे आनंदाने करीत आहेत.. त्यासाठी सीमेवरून काही तोफा आम्ही मागवून घेतल्या आहेत..

महाराज : आम्ही प्रसन्न आहोत.. आमच्या मुळेच हा राज्यशकट व्यवस्थित चालला आहे..

प्रधानजी : यावच्चंद्रदिवाकरौ.. महाराज तुमच्यामुळेच राहील.. रयतेस ही तेच हवे आहे..

महाराज : शाबास! आम्ही प्रसन्न आहोत.. आपले लोक कलाकार गेलेत की आहेत? शिणले असतील..

प्रधानजींस प्रश्नाचा रोख लगेच कळतो.

प्रधानजी : नाही महाराज.. आपल्या सेवेची संधी हेच परमभाग्य.. त्यात शीण कसला? आज परत आपल्या सेवेत हजर करू त्यांस

महाराज : वा! वा! आपली तारीफ करावी तितकी कमीच आहे.. पण आम्ही आज शिणलो नाही.. शिणणार ही नाही.. देश सेवेचे.. व्रत..

प्रधानजी : असिधारा व्रत महाराज.. आपण घेतले आहे..

महाराज : हा शब्द छान आहे..अभिसारा... असिभारा.. असिधारा.. नेहमी वापरत चला.

प्रधानजी : होय महाराज.. हुकूम महाराज.. देशसेवेचे असिधाराव्रत घेऊन राज्यशकट हाकणाऱ्या या महाराजांचे राज्य याव्च्चंद्रदिवाकरौ राहो.. आपल्या राज्याचे गुणगान आपली रयतच नाही तर पूर्ण पृथ्वीतलावर समस्त मानव जात, पशूपक्षी, झाडे पाने.. फुलेफळे डोंगरदऱ्या सूर्य़चंद्र, ग्रहतारे.. सारेच करोत.. आणि करत राहोत..

महाराज : वा! आजच्या दरबाराची सुरूवात तर चांगली नाही झाली पण शेवट तर चांगला झाला..

शेवट म्हणजे दरबार बरखास्तीची वेळ हे प्रधानजी ताडतात..

प्रधानजी : तेव्हा दरबार बरखास्त महाराज?

महाराज : दरबार बरखास्त..

दरबारी : महाराजांचा विजय असो!

९

महाराज दरबारात येतात..

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती चक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे.. जब तक सूरज चांद रहेगा चक्रमादित्य का नाम रहेगा.. आलमगीर.. जहांपनाह.. सलामे आलेकूम.. राजा ए चक्रमपूर.. मालिक ए दौलत.. समाज ए बदौलत.. राजाधिराज पधार गए हैं.. फिरसे एकबार निगाह रखो..

महाराजांच्या हातात न पेटवलेली अगरबत्ती. शिपाई गोंधळतो.. यावर अत्तर फवारायचे की ही पेटवायची? जीव मुठीत घेऊन तो बसून राहतो आणि प्रधानजींकडे पाहातो. प्रधानजींच्या चेहऱ्यावरची एकही रेषा हलत नाही.

महाराज अगरबत्तीचा सुवास घेत बसतात. शिपाई सुटकेचा नि:श्वास टाकतो.

महाराज : काय प्रधांजी.. काय हालहवाल राज्याची?

प्रधानजी : आपण असताना उत्तमच असणार.. सगळे गणवेश घालून फिरत आहेत.. रोज सगळीकडे आज्ञेनुसार भोजन बनते आहे.. एकी वाढतेय.. भांडणे

नाहीत.. आता एकाच प्रकारच्या भोजनाने शेतकरी कुठले धान्य पिकवणार याला एक नियम मिळाला आहे. लोक आज काय कपडे घालू नि आज काय खाऊ हा अनुत्पादक विचार सोडून तो वेळ विधायक कार्यात घालवू लागले आहेत.. आपल्या दृष्टीचा फायदा सर्वांनाच होत आहे.. काही जणांस याबद्दल शंका असल्याचे आमच्या कानी आले आहे.. पण एका रात्रीत सारी जनता गणवेशधारी झाल्याने होणारे फायदे आता दिसत आहेत..

महाराज : आमच्या कर्तृत्वाबद्दल आम्हाला कधीच शंका नव्हती.. आम्ही चतुर.. हुशार.. चाणाक्ष.. त्या पुढे ते.. असी.. असिदार.. वाले वाक्य म्हणा प्रधांजी..

प्रधानजी : हुकूम महाराज.. आपल्या सारख्या सदैव राष्ट्रहिताचे विचार करण्याचे असिधारा व्रत घेतलेल्या राजामुळे हा राज्यशकट यावच्चंद्रदिवाकरौ असाच चालत राहील.. महाराज : वा! आम्ही प्रसन्न आहोत.. चरणदासांनी ओळी लिहिल्यात..

प्रधानजी : अर्थात महाराज.. आम्ही लिहवून घेतल्या.. ऐकाव्यात महाराजांनी..

तू न्यायी तू ज्ञानी

तू विज्ञानी तू सज्ञानी

सर्व जगात वेड अज्ञानी

पोहोचवे प्रकाश तुझा..

चरणदासाला बंदुकीच्या नळीच्या धाकावर कविता स्फुरणे अवघडच.. पण महाराजांना खूश करणे तसे सोपे त्यामुळे त्यांनी नि:श्वास टाकला असणार या चार ओळी लिहून..

महाराज : वा! रोज चारोळीचा रतीब सुरू ठेवा.. आमच्या अंगात नवीन स्फुरण चढते..

प्रधानजी : जशी आज्ञा महाराज.. आम्ही अजून एक सांगू इच्छितो..

महाराज : बोलावे प्रधांजी

प्रधानजी : चरणदासाच्या धर्तीवर अजून कवी घडवण्याचे आदेश आम्ही शिक्षणमंत्र्यांस दिले आहेत.. काही वर्षातच ते अक्षरजुळणीत तरबेज होऊन आपल्या सेवेत रूजू होऊ शकतील..

महाराज : आम्ही फार प्रसन्न आहोत.. मग आम्ही रोज तीन वेळा अशा कविता ऐकू शकू.. त्या चरणदासास त्याची शिक्षा देऊ शकू

प्रधानजी : होय महाराज.. अजून एक.. शेजारील राजे तुकडोजी यांच्याकडून खलिता आला आहे.. आज्ञा असल्यास वाचून दाखवू महाराजांस..

महाराज : काही विशेष? राज्यावर काही संकट तर नाही? आम्ही लोककलांना उत्तेजन द्यावयास लागलो की शेजारील राष्ट्र कागाळ्या काढतात.. तेथे ढोलकीच्या तालावर आमच्या जिवास घोर लागून राहतो..

प्रधानजी : महाराजांची वेदना आम्ही समजू शकतो.. पण खलिता गुप्त असल्याने आम्हास काही ठाऊक नाही.. आपली आज्ञा असल्यास उघडू आम्ही

महाराज : वाचावे.. बघूयात तुकडोजी काय म्हणतात

प्रधानजी : हुकूम महाराज.. ऐकावे..

प्रधानजी वाचू लागतात

बंधू चक्रमादित्य महाराज यांसी,

राजे तुकडोजींचा सादर दंडवत!

आपल्या राज्यातील माजलेल्या खळबळीविषयी आमच्या कानी आले आहे. विशेषत: गणवेशधारी आपली जनता सीमाभागात आढळून आल्यास आमचे नागरिक अचंब्याने त्यांस पाहात आहेत. त्यातही आमच्या प्रजेस याचे कौतुक असावेसे वाटते. असो. आमचे काही दूरस्थ नातलग आपल्या प्रदेशी वास्त्यव्य करून आहेत. त्यांच्या रदबदलीसाठी हा खलिता धाडत आहे. त्यांचे नवजात जुळी बालके व तीन वर्षांखालील कन्या यांस या प्रचंड मोठ्या गणवेशात फिरणे.. अंग झाकणे मुश्कील झाले आहे.. आपण काय विचाराने एकाच मापात सर्वांस घालू इच्छिता? आपले प्रजाजन सोशिक आहेत पण आमच्या नातलगास होणार जाच आपणास दिसत नाही काय?

या ऊपर आपण कमीतकमी एक मापाची बंधने तरी दूर करावीत असा आमचा आपणास निर्देश आहे..

आमचे सैन्य सदा रणांगणावर तरवरीस धार काढत असते.

सूज्ञांस अधिक सांगणे न लगे..

आपण याकडे जातीने लक्ष घालावे.

इति लेखनसीमा.

आपला,

राजे तुकडोजी

महाराज रागाने थरथरतात, हात कापतात.. तसेच बोलत राहतात

महाराज : खामोश! आम्ही सार्वभौम.. आम्हास उत्तरे ठाऊक.. आम्हास कोणी प्रश्न विचारलेले आम्हास चालत नाही.. आम्हीच एक उत्तर आहोत सर्व प्रश्नांचे.. आम्हांला कोण प्रश्न विचारू शकतो.. कोणाकडे सैन्य असेल म्हणून आम्ही असली भाषा सहन करावी? आम्हालाच निर्देश? आम्हालाच प्रश्न?आम्ही या भूमीचे स्वामी.. त्यावर असली भाषा? प्रधांजी, या तुकडोजीच्या खलित्याचे तुकडे करा.. खलित्यास जाळून टाका.. त्या तुकडोजीच्या नातलागास त्यांच्या राज्यात धाडून द्या..

प्रधानजी : उत्तम महाराज.. न रहेगा बास न बजेगी बासुरी.. अशा देशद्रोह्यांसाठी हा देश नाही.

महाराज : तुमचे म्हणणे खरे आहे.. ज्यास शेजारील राष्ट्राबद्दल ममत्व आहे त्यांस तिकडे धाडून द्यावे. आपल्या राज्यात शुद्ध देशप्रेमी आणि एक विचारी प्रजा राहिल. हा आमचा आदेश आहे..

प्रधानजी : होय महाराज, आज्ञा महाराज.. जी हुजूर महाराज.. जशी आपली आज्ञा.. पण राजे तुकडोजींचा इशारा?

महाराज : त्यांच्या त्या नातलगास तिकडे पाठवा नाहीतर आपल्या राज्यातील खास दर्जा द्या.. म्हणजे ते हवे ते कपडे घालू शकतील. एका नागरिकाच्या असे करण्याने युद्ध टळणार असेल तर तसेच करावे.. आम्ही शांतता प्रिय आहोत.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.. आपल्या हुकुमाची तामिली होईल.. आणि आपल्या शांतिप्रियतेच्या कथा आम्ही राज्यभर पसरविण्याची व्यवस्था करतो महाराज..

महाराज : आम्ही प्रसन्न आहोत.. आपल्या कामाच्या वेगावर..

प्रधानजी : धन्यवाद महाराज.. आपण आहात म्हणून हा राज्यशकट नीट हाकला जात आहे..

महाराज : प्रधांजी, आम्ही शिणण्यास इतका राज्यकारभार पुरेसा आहे काय?

प्रधानजी : महाराज. आपण घेता ते कष्ट आम्हाला दिसतात.. त्यामुळे आपण विश्राम करावा असे वाटते.

महाराज : मग वाट कसली पाहता.. दरबार बरखास्त..

दरबारी : महाराजांचा विजय असो

महाराज येतात दरबारात. ते येण्याची घोषणा होते.

महाराज दरबारात येतात..

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती चक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे.. जब तक सूरज चांद रहेगा चक्रमादित्य का नाम रहेगा.. आलमगीर.. जहांपनाह.. सलामे आलेकूम.. राजा ए चक्रमपूर.. मालिक ए दौलत.. समाज ए बदौलत.. राजाधिराज पधार गए हैं.. सकल जनांचा कैवारी.. बहुत जनांचा आधारी.. पधार रहे हैं.. फिरसे एकबार निगाह रखो..

महाराज आज अगरबत्ती पेटवून हातात घेऊन आलेले. त्याचा वास घेतात. तो धूर नाकात जाताच महाराजांना खोकल्याची जोरदार उबळ येते. सारे दरबारी स्तब्ध.. या खोकल्यामुळे कोण तोफेतोंडी जाऊ शकतो?

महाराज : आमच्या सेवकाने ही अगरबत्ती पेटवली नसती तर आम्हास हा खोकला झाला नसता.. त्यासाठी जी काडेपेटी वापरली तीच नसती तर त्याने

अगरबत्तीच पेटली नसती, त्या काडीवर गुल नसता तर ती काडी पण पेटली नसती. त्या गुलाचा शोध लागला नसता तर.. ती काडेपेटीच नसती.. आणि माणसाने अग्नीचा शोध लावला नसता तर.. हे सर्व झालेच नसते. तेव्हा समूळ इलाज करा.. आमच्या खोकल्याचे मूळ त्या अग्नीच्या शोधात आहे. तेव्हा अग्नीचा शोध लावणाऱ्याचा शोध घ्या आणि त्याला तोफेतोंडी द्या.

प्रधानजी : जो हुकूम.. आपल्या सखोल मूलगामी विचारामुळेच हे राज्य प्रगती करत आहे.

महाराज : आणि राज्यशकट.. यावच.. यावच्च.. यांव.. यांव...

प्रधानजी : यावच्चन्द्रदिवाकरौ..

महाराज : असिधारा व्रताने हाकत आहोत.

महाराज आपले आवडते शब्द वाक्यात उपयोग केल्या सारखे कसेही वापरतात.

प्रधानजी : चरणदासांच्याकडून चारोळया आल्या आहेत महाराज..

महाराज : त्या ऐकूच.. आपले कवी बनण्याचे प्रशिक्षण कुठवर आलेय प्रधानजी?

प्रधानजी : कालच सुरुवात झालीय महाराज.. काही वर्षांचा अवधी लागेल..

महाराज : ठीक.. ऐकवा त्या ओळी.. म्हणजे आम्हास स्फुरण चढेल..

प्रधानजी : हुकूम महाराज..

सकल जन कैवारी

दुश्मनास भारी

जशी हत्तीवर अंबारी

तैसा राजा..

महाराज : वा! आम्ही प्रसन्न झालो आहोत.. राज्याची हाल हवाल व्यवस्थित असणारच.. आम्ही आहोत म्हणजे.. तुकडोजी राजांस काय जवाब धाडला?

प्रधानजी : आपल्या आदेशानुसार आम्ही त्या नातलगांस हवे ते कपडे वापरण्याचा दर्जा दिलाय महाराज.. आता तणाव निवळला आहे.. राजनैतिक उपायांनी युद्ध टळले आहे.

महाराज : आम्ही प्रसन्न आहोत प्रधांजी.. अजून काय खबरबात?

प्रधानजी : होय महाराज.. एक नवीन घटना कानी घालणे आहे..

महाराज : बोलावे प्रधांजी..

प्रधानजी : एक चक्रमपुर वार्ता नावाचे वृत्तपत्र पत्र आमच्या पर्यंत पोहोचले आहे.

महाराज : वृत्तपत्र? हे नवीन काय?

प्रधानजी : आम्हीही हे प्रथमच पाहात आहोत.. ज्यानी ते काढले त्यास संपादक म्हणतात..

महाराज : आणि काय लिहिले जाते?

प्रधानजी : आजूबाजूच्या घडणाऱ्या घटना.. बातम्या म्हणतात त्यांना.. त्यात आपल्या राज्यातील घटना आहेत.. बाजूच्या राज्यातील ही आहेत..

महाराज : वा! अति सुंदर.. यातून सर्व राज्यातील घटना सर्वांसमोर येतील.. उत्तम कल्पना... उदाहरण म्हणून काही वाचून दाखवावे प्रधांजी..

प्रधानजी : हुकूम महाराज.. ऐकावे.. दिनांक दहा.. काल येथील खुर्डूवाडी बुद्रूक मधील एक घरात एका इसमास अपघात झाला असून त्यात त्याच्या पायाचे हाड दुभंगले आहे. शासकीय वैद्य त्याच्यावर उपचार करीत आहेत. आता ही दुसरी खबर ऐकावी महाराज... कोरगाव खुर्द येथील शेतकरी मंबाजी येवले यांच्या शेतात पन्नास किलो वजनाचा भोपळा आला असून तो पाहण्यासाठी गर्दी लोटत आहे. असा भोपळा आजवर कुणी पाहिला नसल्याचे मत एक वयोवृद्ध शेतकरी येसाजी कोंडाजी भिकबाळे यांनी व्यक्त केले.

महाराज : वा! राज्यातील सारे जाणून घेण्यास हे उपयुक्त आहे. आम्हास हे आवडले आहे.. अजून वाचावे..

प्रधानजी : हुकूम महाराज. ऐकावे.. कोरेगांव खुर्द येथील नवतरूण क्रीडा मंडळात वार्षिक चमचालिंबू शर्यतीत प्रथम क्रमांक मिळवलेल्या धोंडाजी शिवकर वय वर्षे पाच याचे सर्वत्र कौतुक होत आहे. आपला ढगळ गणवेश सांभाळून त्याने ही कामगिरी केल्याने त्याचे विशेष कौतुक होत आहे

ढगळ शब्दावर महाराजांच्या चेहऱ्यावर आठ्या उमटतात. ते काही बोलत नाहीत पण प्रधानजींनी हे टिपले आहे..

प्रधानजी पुढे वाचू लागतात..

प्रधानजी : शेजारील उमटणे नदीस पूर येण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून नदीकिनारील घरांस हलवण्याचे आदेश आहेत... ही अजून एक खबर.. किल्ले बंधनगडच्या कड्यावरून पडून एक ठार. आमच्या हाती आलेल्या वृत्तानुसार सदर युवक तेथे सहली साठी गेलेला होता. कड्यावरून वाकून पाहताना त्यास भोवळ येऊन पडून त्याचा मृत्यू ओढवल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

महाराज : वा वा वा वा.. छान.. यामुळे आपल्याला सर्व देशभरच्या बातम्या समजतील.. या वृत्तपत्रपत्राच्या कल्पनेबद्दल त्या समपादकाला..

प्रधानजी : माफी हुजूर.. संपादक..

महाराज : आम्ही तेच म्हणत होतो.. त्या संपादकास खास बक्षीस दिले पाहिजे..

प्रधानजी : आज्ञा महाराज.. पण अजूनही एक विशेष आहे.. त्यास संपादकीय म्हणून लिहिले आहे.. एखाद्या घटनेवर त्या संपादकाची मते त्यात लिहीली जातात असे वाटते..

महाराज : वाचावे प्रधानजी..

प्रधानजी : जो हुकूम.. यास अग्रलेख संबोधून लिहिले आहे..

नदीच्या पात्राची खोली

आपल्या राज्यातील एक नदी जिचे नाव एकसर नदी आहे तिच्या पात्राची खोली वाढवण्याचे आदेश आहेत. आम्ही बारकाईने या प्रकल्पाचा अभ्यास केला असता त्यात काही त्रूटी दिसून येत आहेत. या प्रकल्पास विरोध ही आमची भूमिका नाही. पण जनमताचा विचार घेणे तितकेच महत्वाचे

असे आमचे मत आहे. नदीपात्रातील गाळ आणि त्याची विल्हेवाट याबद्दल अधिक माहिती जनतेस होणे जरूरी आहे असेही आमचे मत आहे.

महाराज : प्रधांजी थांबवावे.. हे सारे त्वरित थांबवावे.. वार्ता सांगण्यापर्यंत सारे ठीक पण आम्हास यात मोठाच धोका दिसतो आहे. कुणी आपली मते अशी व्यक्त करू लागल्यास.. आज या बिन महत्वाच्या बाबी बद्दल आहे.. उद्या अजून कशाबद्दल.. हा धोका वेळीच ओळखला पाहिजे.. आणि अशाने ही वृत्तपत्रे लोकांस वाईटसाईट मनात भरवतील.. लोक अजून काही विचार करतील.. संपूर्ण राज्यास याचा धोका आहे

प्रधानजी : आपण आदेश द्यावा महाराज..

महाराज : हे वृत्तपत्राचे खूळ मुळातून उखडून टाकले पाहिजे.. हे सारे इथेच बंद करावे.. एकीकडील माहिती दुसरीकडे.. लोक आपले मत बनवू लागल्यास राज्य धोक्यात येईल..

प्रधानजी : आपल्या दूरदृष्टीचे आम्हाला अतिशय कौतुक वाटत आहे महाराज..

महाराज : राज्य चालवणे ही एक कसरत आहे. प्रधानजी आम्ही चतुर चाणाक्ष आहोत.. म्हणून ही गादी सांभाळून आहोत.. नाहीतर परकीय शक्ती आपला ताबा घेतील.. राष्ट्राचे शत्रू याचा गैरफायदा घेतील.. या वृत्तपत्रास असले उद्योग ताबडतोब बंद करावयास सांगावे.. हा आमचा आदेश आहे. त्यांनी न मानल्यास..

प्रधानजी : होय महाराज.. ते न म्हणण्याचा प्रश्नच नाही.. आपला आदेश कोणी टाळू शकत नाही..

महाराज : हे उद्योग ताबडतोब बंद पाडा..

प्रधानजी : जी हुजूर.. ते बंद होईल.. पण एक सूचना.. अभय असेल तर..

महाराज : तुम्हाला नेहमीच अभय असते.. बोला..

प्रधानजी : महाराजांना हा वृत्तपत्र प्रकार आवडला होता.. जोवर त्यात खबरी आहेत. तर आपल्या राज्यातील बातम्या देणारे आपले असे वृत्तपत्र का असू नये? ते आपण स्वत: दरबारातून प्रकाशित केले तर उत्तम. त्यावर संपादक म्हणून आपले 'हो' म्हणणारे आता प्रशिक्षित होत आहेत त्या पैकी कोणी नेमून टाकू..

महाराज : आपले म्हणणे आम्हास पटत आहे.. बोला पुढे

प्रधानजी : महाराज आम्हाला तरी वृत्तपत्र ही मोठी ताकद वाटत आहे.. तिचा योग्य वापर केला तर ती राज्याची ताकद वाढवू शकतात. ती वापरल्यास आपली मते दूरवर पोचवण्यासाठी मदत होईल. आणि आम्ही तुमची महतीही घराघरातून पोहोचवू शकू आपणास.. हवी तशी..

महाराज : वा! प्रधांजी तुम्ही चांगलाच विचार करता.. लवकरच हे नवीन वृत्तपत्र काढण्याची व्यवस्था करा..

प्रधानजी : हुकूम महाराज.. थोडा अवधी

महाराज : नाही प्रधांजी.. अवधी गरजेचा नाही.. हे जे चालू वृत्तपत्र आहे.. काय नाव त्याचे?

प्रधानजी : चक्रमपुर वार्ता..

महाराज : तर त्याच्याच संपादकास सन्मानाने पदरी घ्या.. न मानल्यास चरणदासासारखे आपल्या पदरी ठेवा त्यास..

प्रधानजी : जो हुकूम महाराज.. एका कवी बरोबरच एक संपादक पाळणे आपल्या इभ्रतीस शोभून दिसेल महाराज.. त्यामुळे आपली लोकप्रियता अजूनच वाढेल यात शंका नाही..

महाराज : तेव्हा प्रधानजी.. वृत्तपत्र तेच अन तसेच ठेवा.. संपादकास गोडीगुलाबीने समजवा.. अन फक्त मजकूर आपण डोळयांनी पाहून जाऊ द्यावा..

प्रधानजी : हुकूम महाराज..

महाराज : या साऱ्याच प्रकाराने आम्ही शिणलो आहोत.. आम्हाला विश्रांतीची सक्त जरूरी आहे..

प्रधानजी : खरंय महाराज.. आणि आपण दरबारात नसलात तरी सतत राज्याचाच विचार करीत असता.. तेव्हा विश्रांती अन विरंगुळयाची गरज आहे आपणास..

महाराज : तेव्हा हा दरबार बरखास्त..

दरबारी : महाराजांचा विजय असो !

महाराज येतात दरबारात. ते येण्याची घोषणा होते.

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती चक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे.. जब तक सूरज चांद रहेगा चक्रमादित्य का नाम रहेगा.. आलमगीर.. जहांपनाह.. सलामे आलेकूम.. राजा ए चक्रमपूर.. मालिक ए दौलत.. समाज ए बदौलत.. राजाधिराज पधार गए हैं.. सकल जनांचा कैवारी.. बहुत जनांचा आधारी.. दृढ निर्धारी.. एकमेव चक्रमपुरी.. पधार रहे हैं.. निगाह रखो.. निगाह रखो.. बारबार निगाह रखो..

नाही महाराजांच्या हातात अगरबत्ती आहे.. यावेळी न पेटवलेली. महाराज लांब श्वास घेतात नाकाजवळ अगरबत्ती नेऊन, पण वास येत.

महाराज : शिपाई.. अत्तराचा फवारा?

शिपाई थरथरत उठतो. कापत्या हातांनी अत्तर फवारतो. महाराज दीर्घ श्वास घेतात.

महाराज : वा! शाबास! शिपाई.. अति सुंदर! प्रधांजी या शिपायाचा पगार शंभर मुद्रांनी वाढवा..

ज्या गोष्टीसाठी एक शिपाई बळी गेला त्याच गोष्टीसाठी या शिपायास पगारवाढ मिळावी? महाराजांच्या मनात काय असावे? प्रधानजी विचार करतात. पगारवाढी पाठोपाठ शिपायास महाराज तोफेतोंडी देण्याचा आदेश तर देणार नाहीत ना? ते टळावे म्हणून चपळाईने ते चरणदासाच्या ओळी वाचण्याचे ठरवतात.

प्रधानजी : महाराजांचा विजय असो.. चरणदासांनी आज बहारीचे काव्य लिहिले आहे.. म्हणजे आम्ही लिहून घेतले आहे त्यांच्याकडून. आज्ञा असल्यास ऐकवतो..

महाराज : ऐकवावे.. आम्हास त्यामुळे पुरण नव्हे.. स्फुरण चढेल..

प्रधानजी : ऐकावे महाराज..

चरणदास म्हणतात..

धन्य धन्य ते राज

आणिक

धन्य धन्य ते काज

जन गन अन

जन धन येथे

फिरती सोडून लाज

तव कीर्तीचा सुगंध पसरे

दाही दिशांतूनी

ऐकताच मन होई उत्फुल्ल

तव विचारी होई उन्मनी

महाराज : वा! वा! अति सुंदर.. उन्मनी.. हा शब्द सुंदर आहे.. छान.. वापरत चला अधूनमधून..

प्रधानजी : होय महाराज.. जो आज्ञा महाराज.. हुकूम महाराज

महाराज : आम्ही आहोत म्हणून.. हे राज्य

प्रधानजी : आम्ही बोलतो पुढे महाराज.. म्हणून हा राज्यशकट असिधारा व्रत घेतल्यासारखा उन्मनी अवस्थेत यावच्चन्द्रदिवाकरौ प्रगतीपथावर आहे महाराज..

महाराज : वा! आम्ही खूश आहोत.. अत्यंत खूश.. त्या वृत्तपत्रविषयाचे पुढे काय झाले प्रधांजी ?

प्रधानजी : सारे काही आपल्या आज्ञेनुसार महाराज.. संपादकाने काही कुरबूर केली नाही.. त्यामुळे त्यांना मोकळे ठेवले आहे. आजची चरणदासाची रचना आजच्या चक्रमपूर वार्ता मध्ये छापली आहे महाराज.. त्यामुळे ती

सर्वसामान्य जनतेस ही वाचता येईल. आपल्या त्या नव्या दमाच्या संपादकाची तयारी होईल तोवर हे ठीक आहेत महाराज.

महाराज : वा! आमचे राज्य खरेच खूप प्रगतीपथावर आहे..

प्रधानजी : खरे आहे महाराज.. हे चक्रमपूर वार्ता आपल्या कीर्तीचा सुगंध चारी दिशांना पसरवेल.

महाराज : वा! आम्ही खूप प्रसन्न आहो.. प्रधानजी : सैनिकही आपली शोध मोहीम चालवीत आहेत. आपल्याबद्दलच्या आदराने सर्व भारलेले आहेत.. अजून कोणी देशद्रोही सापडलेले नाही.. सर्व आपल्या आदेशांचे पालन करत आहेत.

प्रधानजी हे बोलत असतानाच सैनिक एका गणवेशातील सामान्य माणसास पकडून आणून पुढ्यात टाकतात.

महाराज : प्रधांजी.. हा कोण आहे?

चूकून कोणी सैनिक काही बोलून जीव गमावून बसू नये म्हणून प्रधानजी घाईघाईत बोलतात..

प्रधानजी : हा देशद्रोही असणार महाराज.. काही समयातच आम्ही आपणास अवगत करतो महाराज..

प्रधानजी सैनिकाकडून माहिती घेतात.

प्रधानजी : महाराज.. महाराज.. आमचा अंदाज खरा ठरला.. देशद्रोह.. या आधीच्या देशद्रोह्यांहून अधिक खतरनाक.. राजद्रोही असा हा इसम..

महाराज : असे केले काय याने?

प्रधानजी : आधीच्याने कोशिंबीर खाल्ली असेल तर याने.. आमच्याने नाही सांगवत महाराज..

महाराज : कितीही कटू असो.. ते आम्ही पचवू.. तशी तयारी आहे आमची.. हलाहल पचवणाऱ्या शंकराचे भक्त आम्ही..

प्रधानजी : आपण महान आहात महाराज.. हा क्षूद्र जीव या शूर शिपायास त्याच्याच घरी आढळला.. तो कागदावर काही लिहीत होता.. हळूच पुटपुटत वाचत होता..

महाराज : असे काय होते त्यात प्रधांजी?

प्रधानजी : आपल्या चतुर आणि शूर शिपायांनी तो कागद जप्त केला आहे महाराज.. हाच तो कागद ज्यावर हा राष्ट्रद्रोही कारवाया करीत होता..

महाराज : वाचावा तो कागद..

प्रधानजी त्या कागदावर नजर फिरवतात.

रागाने थरथरल्यासारखे करतात.

प्रधानजी : आमच्याने नाही वाचवत महाराज.. (नाटकीपणे) असे काही वाचण्याहून आमची जीभ का झडत नाही..

महाराज : कर्तव्य.. प्रधानजी कर्तव्य पार पाडावेच लागेल आपणास..

प्रधानजी : हुकूम महाराज.. ऐकावे.. यावर लिहिले आहे.. कविता असावी..

कोण तो कोण गावचा राजा..

वाजवित आपुला बेंडबाजा..

त्याच्या खाण्यात येई खाजा..

उघडून बसला दरवाजा..

मला वाटते महाराज कविताच आहे..

महाराज : वाचा पुढे..

प्रधानजी : हुकूम..

दरवाजातून आला उंदीर..

तेथे होते एक मंदिर..

मागे लागले मांजर..

उंदीर जाहला जर्जर..

राजा म्हणाला त्याला..

काय तो तुझा तोरा..

राजाचा वाजला बोऱ्या..

महाराज : बास ! नाही ऐकवत आम्हास.. काय हा राजद्रोह.. किती हा उपमर्द.. याची ही हिंमत ?काय म्हणणे आहे याचे?

प्रधानजी : शिपाई म्हणतो की, याचे म्हणणे आहे की हा एक लहान मुलांसाठी कविता करीत होता..

महाराज : असली? ही कविता आहे? आपले चरणदास कसे काव्य करतात.. आणि हा.. नतद्रष्ट.. राजद्रोही.. देशद्रोही.. राष्ट्रद्रोही.. दूर घेऊन जा यास नजरे समोरून..

प्रधानजी : याची सजा?

महाराज : तोफेतोंडी देऊन कडेलोट करा.. त्यानंतर जमल्यास हत्तीच्या पायी द्या..

प्रधानजी : आपल्या हुकुमाची तामिली होईल महाराज.. आणि आपण व्यथित होऊ नये.. आपले शिपाई डोळयात तेल घालून अशा लोकांचा बंदोबस्त करीत आहेत..

महाराज : ते आम्हास ठाऊक आहे. आम्ही व्यथित दुसऱ्याच कारणाने आहोत..

प्रधानजी : आपल्याला व्यथित करणारी अशी कोणती गोष्ट असू शकते महाराज ?

महाराज : आम्ही न्यायी. त्रिभुवनात आमच्या न्यायदानाचा डंका वाजतो.. आम्ही सर्व शक्तिमान.. पण एका बाबतीत आम्ही हतबल आहोत एकदम.. कितीही मोठा गुन्हा घडो.. एखाद्यास आम्ही फक्त एकदाच देहदंड देऊ शकतो.. त्या नंतर आमची शक्ती अपुरी..

प्रधानजी : महाराज.. आपले संवेदनशील मन आम्ही समजू शकतो.. आपली व्यथा आपणास एवढे दु:खी बनवू शकते..

महाराज : या इसमास कडेलोटाची शिक्षा द्या.. जागता पहारा अजून वाढवा.. कोणी आमच्या या महान देशाविरूद्ध काही करत आहे का? डोळयांत तेल घालून लक्ष ठेवा.. कोणाचाही मुलाहिजा बाळगू नका.. आम्ही आता शिणलो आहोत.. या देशाची चिंता आम्हास स्वस्थ बसू देत नाही.. आम्ही विश्राम नाही घेणार.. एकांतात चिंतन करू इच्छितो.. दरबार बरखास्त..

दरबारी : महाराजांचा विजय असो !

दरबारी : महाराजांचा विजय असो.. राजाधिराज चक्रवर्ती चक्रमपुरसम्राट चक्रमादित्य महाराज पधार गये हैं.. निगाह रखो..

महाराज चक्रमादित्य अमर रहे.. जब तक सूरज चांद रहेगा चक्रमादित्य का नाम रहेगा.. आलमगीर.. जहांपनाह.. सलामे आलेकूम.. राजा ए चक्रमपूर.. मालिक ए दौलत.. समाज ए बदौलत.. राजाधिराज पधार गए हैं.. सकल जनांचा कैवारी.. बहुत जनांचा आधारी.. दृढ निर्धारी.. एकमेव चक्रमपुरी.. पधार रहे हैं.. निगाह रखो.. निगाह रखो.. एक बार रखो.. दो बार रखो.. बारबार निगाह रखो..

महाराज आज एक फुलाचा देठ घेऊन प्रवेशतात. फूल बहुधा रस्त्यात खाली पडले असावे. देठाचा वास घेत बसतात. शिपाई पुढे सरकतो.. अत्तराचा फाया घेऊन.. महाराज एका हाताने त्याला पाठी जाण्यास सांगतात. बहुतेक ते फूल पडल्याचे त्यांच्या लक्षात आले असावे.. तो देठ मुद्दाम पकडल्यासारखा वाटावा म्हणून शिपायास मागे पाठवले असावे. शिपाई आजतरी जीव वाचल्याच्या आनंदात अदबीने उभा राहातो.

महाराज : आज आम्ही.. आज नाही.. काल पासून आम्ही ऊवदिग्न.. नाही उद्विग्न आहोत. घोर चिंतेत आहोत.. रात्र रात्र आम्ही मळमळतो.. नव्हे तळमळतो.. विदेशी पेयावाचून आम्हास निद्रा नाही. आम्हास आमची नि आमच्या सिंहासनाची चिंता नाही.. हा देश.. हे राज्य.. हे राष्ट्र.. सर्वांची चिंता आम्हाला पोखरून काढते..

प्रधानजी : महाराजांनी असे हताश होऊ नये.. आपले एक एक स्वप्न आम्ही पूर्ण करू.. आपण फक्त आदेश द्या..

महाराज : तो तर देऊच.. आदेश देऊ.. संदेश देऊ.. विदेश देऊ.. त्याचा पापठुरावा करा.. पाठपुरावा.. कराल हे आम्हास ठाऊक आहे.. पण आम्हास मुळापासून विचार करण्याची खोड आहे.. एक करावे.. चरणदासास घेऊन यावे.. त्वरित त्यास काही पंक्ती म्हणावयास सांगा.. मग आम्हास काही स्फुरण चढेल.. त्या कालच्या कवितेस उतारा पाहिजे..

प्रधानजी : त्यांच्याकडून त्वरित लिहून आणतो..

महाराज : त्यांना समक्ष हजर करा.. ते नाही करू शकले कविता तर दंबुकी.. नव्हे बंदुकीने मस्तक उडवा..

प्रधानजी : आणि ते दरबारात बोलले तर त्यांना तोफेतोंडी द्यावे महाराज?

महाराज : हा चरणदास आम्हास टाक्यासारखा.. नव्हे काट्यासारखा सलतो आहे. आमच्या न्यायदानाच्या कामात एवढा मोठा अडथळा.. ? त्याची शिक्षा त्याला मिळेलच.. फक्त ते आपले ट्रेनिंग वाले कवी रूजू झाले की.. जावे..

शिपाई चरणदासास घ्यावयास जातात.

प्रधानजी : महाराजांची तब्येत आज जरा नासाज दिसतेय..

महाराज : गेल्या काही दिवसांत.. विशेषत: तो शेवटला.. आमच्या विरूध्द बोलणारा.. इसम.. आम्हास काजळी.. नव्हे काळजी लागून राहते.. आम्ही नसू तर या राज्याचे काय ? आम्ही म्हणजे देश.. आम्ही देशाचे एकमेव तारणहार.. आम्ही म्हणतो तेच देशहित.. आम्ही साऱ्या देशास एक करण्याचा वासा.. नव्हे वसा घेतलाय.. सगळयाना एक वेश घातला.. एक भोजन.. आता एक भाषा.. एक चालरीत.. ही एकी.. आम्ही सारे एक करू.. आकाश पाताळ ही एक करू.. पण आम्हास हा देश ठोमा करणे आहे.. नव्हे मोठा करणे आहे.. अशात आमच्या विरूध्द कोणी.. तो देशद्रोही.. तो राजद्रोह.. याच्या मुळाशी जावे.. उखडून काटा.. नव्हे.. टाकावे..

प्रधानजी : महाराजांनी सखोल चिंतन केलेले दिसते..

महाराज : एकदम खसोल चिंतन प्रधांजी.. आम्ही सतत हाच विचार करीत आहोत.

प्रधानजी : चरणदासाच्या चार ओळी ऐकल्यास बरे वाटेल आपणास.. अजून आले कसे नाहीत?

इतक्यात शिपाई चरणदासास घेऊन येतात.

प्रधानजी : महाराजांच्या आदेशानुसार तुम्हाला आताच्या आता महाराजांना प्रसन्न करणारे काव्य म्हणून दाखवावे लागेल.. महाराजांनी तूर्तास तुमच्या शिक्षेस स्थगिती दिली आहे..

चरणदास : हुकूम महाराज..

आपल्या आज्ञेनुसार..

धन्य धन्य हे जय रसवंती

तव गुणगाने हो जयवंती

भाग्य थोर वर्णावे मम किती

नभी देवगण पुष्पे वर्षिती..

तव गुण वर्णू मी किती पामर

ऋध्धी सिध्धी ढाळती चामर

तव शौर्याच्या गाथा गाता

राजा सह हा नाचीज अजरामर..

न्याय- अन्याय न देखे कोणी

ऋध्धी सिध्धी भरती पाणी

तव महन्मंगल राष्ट्राची महती

गाण्याचे भाग्य जया तो मी ऋणी..

अति महान अती सुंदर मंगल
राज्यकारणे न करिती दंगल
धुवून काढीशी आपुल्या हाती
जे जे दुष्ट.. नीच आणि अमगल..

धन्य धन्य तो जन्म ही अमुचा
तव छत्राची मिळते छाया
एक राजा विण जाई असला
जन्म असला कसला वाया..

प्रभु चरणी.. नच तुझिया चरणी
एक प्रार्थना असली आमची
दे मज लाख लाख ही जन्म ते
करण्या पारायणे तव स्तोत्राची

महाराज : वा! जा तू..

चरणदास जातो..

महाराज : आता आम्ही नॉर्मल वर आलो.. प्रधांजी आम्हास आता स्फुरण चढले आहे.. आता नवीन काही..

प्रधानजी : आपली इजाजत असेल तर.. एक अर्जी आहे..

महाराज : बोलावे प्रधांजी.

प्रधानजी : आपल्या राज्यातील एक संशोधक आहेत.. काल आपण व्यथित झालात म्हणून त्यांच्याशी चर्चा केली.. त्यांना यावर काही सांगावयाचे आहे.

महाराज : या संदर्भात ? काय सांगावयाचे असेल? या बाबतीत तो काय करणार जिथे आमच्यासारखे आम्ही काही नाही करू शकत.. ?

प्रधानजी : यावर काही विचार मांडले आहेत.. अभय असल्यास..

महाराज : आपणास नेहमीच अभय असते प्रधांजी..

प्रधानजी : महाराजांनी त्या संशोधकाच्या तोंडून ऐकल्यास बरे होईल. म्हणजे आपणास ऐकता येईल.. या विषयी काही चिंतन करून विचार मांडलेले आहेत..

महाराज : प्रधांजी.. तुम्ही म्हणता तर अभय असेल त्याला..

प्रधानजी : दरबारात बोलावयास अभय असेल त्यास?

महाराज : होय.. फक्त ते आम्हास पटावयास हवे..

प्रधानजी : होय महाराज.. आम्ही आज त्यास बोलावून घेतले आहे.. विद्याधर शास्त्री नाव आहे..

प्रधानजी इशारा करतात. शास्त्री येऊन उभे राहतात. प्रधानजींनी त्यास बजावलेले आहे.. ते इशारा करेतोवर तोंड उघडावयाचे नाही..

प्रधानजी : महाराज.. हे शास्त्री..

महाराज : बोलावे.. आपले संशोधन सांगावे..

प्रधानजी : दरबारात आज आपण बोलण्यास हरकत नाही.. महाराजांनी आपल्याला अभय दिले आहे..

शास्त्री : धन्यवाद महाराज.. बराच विचार केल्यावर ध्यानात एक बाब आली.. पृथ्वीवर इतके सारे प्राणिमात्र आहेत.. वेगवेगळया लहान मुलांच्या गोष्टींतून ते विचार करताना दाखवले तरी प्रत्यक्षात माणूस हाच एक बरा वाईट विचार करणारा प्राणी आहे. याला कारण माणूस हा विकसित आहे. त्याचा मेंदू विकसित आहे. हे विचारच माणसाला घडवतात वा बिघडवतात.. माणसाच्या मेंदूत उगम पावणारे विचार हेच त्याची ताकद किंवा कमजोरी.. मित्र किंवा शत्रू.. माणूस असा विचार करण्याची ताकद बाळगून असतो.. कुणी परिश्रमाने घडतो.. मेहनतीने शिकतो..

महाराज : इथवर ठीक.. पण याचा संबंध आमच्याशी.. किंवा बंडखोरीशी कसा काय?

शास्त्री : जेव्हा एखादा माणूस आपल्या विरोधात बोलतो.. तेव्हा मुळात त्याच्या डोक्यात तसा विचार आलेला असतो. आता तो विरोधी का? कारण त्याच्या मनातील विचार आणि तुमचे विचार भिन्न असतात.. त्यास वाटते की काहीतरी चुकते आहे.. हे असे नको.. तसे हवे.. वगैरे.. तो म्हणतो.. अमुक एक गोष्ट त्यास अमान्य आहे.. आता तसाच विचार करणारा किंवा नुसता विचार देखील करणारा कुणी त्यास भेटला तर दोघे विचारांची देवाणघेवाण करतात. एकमेकांना आपापले विचार पटवून देतात.. हळूहळू हळूहळू त्यांची ही संख्या वाढू शकते.. या सर्वांच्या मुळाशी काय.. तर एक विचार आणि तो करण्याची क्षमता.. याच्या मुळाशी आहे तो मेंदू.. आपण काही मुले आपल्या पध्दतीने 'हो' म्हणण्यास प्रशिक्षित करत आहात असे प्रधानजी म्हणाले.. हा त्या मेंदूच्याच प्रशिक्षणाचा भाग आहे. असेच प्रशिक्षण सर्वांस दिले जाऊ शकते. योग्य वयातच हे केल्यास अधिक उत्तम.

महाराज : याचा अर्थ आम्ही योग्य तोच विचार करीत होतो..

प्रधानजी : आपला विचार कसा चुकेल महाराज?

शास्त्री : तेव्हा प्रधानजी जे संदेश पाठवून आपली महती घरोघरी पोहोचवतात.. किंवा नव्याने सुरू झालेल्या वृत्तपत्रात आपले गुणगान होते ते ही याच प्रशिक्षणाचा भाग असते..

एखाद्याच्या मेंदूस आपल्याला हव्या त्या पद्धतीने.. त्या माणसाच्याही नकळत.. विचार करावयास भाग पाडणे.. त्या मेंदूस आपणास हवे त्या पध्दतीने घडवणे.. किंवा त्याही पुढे जाऊन त्याची मूळ विचारशक्तीच नष्ट करवून.. त्यास आपण म्हणता ते.. तेच.. आणि तेवढेच काय ते सत्य असे समजण्यास भाग पाडणे.. हे जमले की आपण आपल्या पद्धतीने आपले

देशप्रेम त्या माणसाच्या मनावर बिंबवू शकता.. त्याच्या मनावर वर्षानुवर्षे राज्य करू शकता.. तेव्हा मनावर.. मेंदूवर राज्य करा.. या बाबतीत आमचे अजून संशोधन सुरू आहे.. याहून अधिक कळल्यावर परत हजर होईन.

महाराज : आपण फारच महत्वपूर्ण माहिती दिलीत.. आपण राज्याचे भूषण आहात.. हा गणवेश सोडा.. आपणास खास दर्जा.. आणि शिपायाची खास सुरक्षा आम्ही देत आहोत. आम्ही खूश आहोत.. यावे आपण.

विद्याधर शास्त्री निघून जातात. प्रधानजी सुटकेचा नि:श्वास टाकतात.

महाराज : सर्व दरबारी.. प्रधांजी आपण सोडून.. आपण निघून जावे.. प्रधांजी आम्हास काही चर्चा करावयाची आहे..

सारे दरबारी निघून जातात.

महाराज : प्रधांजी त्या शास्त्रीच्या घराबाहेर शिपाई तैनात करा.. जातात कुठे.. येतात कुठून.. यावर बारीक नजर ठेवा..

प्रधानजी : म्हणजे नजरकैद महाराज?

महाराज : तसेच काही.. त्यास खबर लागू देऊ नका.. असा खोलात विचार करणारी माणसं हे राष्ट्राचे पहिले शत्रू.. त्यांच्या संशोधनाचा फायदा घ्या.. बारीक लक्ष ठेवा.. जोवर सर्व ठीक तोवर काही नाही.. जरा देखील आपल्या विरूध्द काही विचार याच्या मनात आहेत असा संशय वाटला तर त्यास उडवा.. नाहीसे करा वा खऱ्याखुऱ्या कैदेत टाका.. लक्षात ठेवा.. असा विचार करणारी माणसे हेच राज्याचे खरे शत्रू.. जोवर आपल्या बाजूने आहेत तोवर ठीक पण कधीही उलटू शकतात.. तेव्हा अशांपासूनच जास्त धोका आणि अशांपासूनच सावधान राहणे गरजेचे..

प्रधानजी : महाराज.. आपण महान आहात.. चतुर, चाणाक्ष आहात..

महाराज : ते ठीक प्रधांजी.. तो शास्त्री मनात खुशीची गाजरे खात गेला.. बाकी दरबारीही गेले.. आपणही जावे.. दरबार बरखास्त.. !

**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई येथे छातीरोग तज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने आणि त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत.

डॉक्टरांचे नेहमी दिवाळी अंकातून विनोदी कथा प्रकाशित होत असतात.

त्यांनी लिहीलेली ९ पुस्तके ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रकाशित झाली आहेत. आपल्या वाचकांचा प्रतिसाद ऐकण्यास ते उत्सुक असतात. कृपया आपली मते त्यांना कळवा.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

## डॉ. नितीन मोरे यांची साहित्यसंपदा:

चक्रमादित्याचा दरबार(नाटक)

केल्याने शीर्षासन,

नाच जमूरे नाच,

अहम ब्रह्मास्मि,

मच्छर टाईम्स,

संवादोनी प्रकटावे

या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )

प्रेमातुराणां (नाटक)

चक्रमादित्याचा दरबार-२ (नाटक)

ही सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहेकडे लक्ष नका देऊ. रडणाऱ्यां . मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार .दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं . वर्षालाअर्धाकोटी डाऊनलोड होतातवाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप ., ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीतसुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासू .न ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात.रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही .

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हाआपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात . ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवातुम्ही फ़क्त दहा व .ाचक आणाते . तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. .शंभर आणतील. आणि ते दहाहजार आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवाकिंवा .7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे.